
आध्यात्मिक क्रान्ति
-परिवर्तनाचे व्यवस्थापन
[CHANGE MANAGEMENT]
साहेबराव शामराव जवंजाळ

**या मित्रांनो! घेऊन जा! लुटा! लुटा! लुटून न्या!**

# आध्यात्मिक क्रान्ति -परिवर्तनाचे व्यवस्थापन

## हे पुस्तक फ़ुकट नाही

यामागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत.

पण तरीही आम्ही ते वाचकांना विनामूल्य घेऊ देतो.

कारण ई पुस्तक एकदा बनलं की एकजण वाचो वा एक लाख.

आमचं काहीच कमी होत नाही.

उलट आनंद वाढतो.

मजा येते.

पण

तुम्ही ते फ़ुकट का घ्यावं?

तुम्हालाही काही देता येईल.

असे काही द्या ज्याने ई साहित्यच्या लेखकांना, टीमला आणि तुम्हालाही आनंद मिळेल

आणि तुमचं काहीच कमी होणार नाही.

तुम्ही आशिर्वाद आणि शुभेच्छा द्या

लेखकांना फ़ोन करून दाद द्या

आपल्या मित्रांचे मेल पत्ते आम्हाला द्या

मित्रांना हे पुस्तक मेल आणि Whatsapp करा

ई साहित्यचे फ़ेसबुक पेज, इन्स्टाग्राम, टेलिग्राम यांवर स्वतः जा व इतरांना आमंत्रित करा. सोशल मिडियावर ई साहित्यचा प्रचार करा.

सर्वात बहुमोल अशा तुमच्या सूचना द्या

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत ज्याने लेखकाला व ईसाहित्य टीमला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यास मदत होईल. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे व त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा. अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

# आध्यात्मिक क्रान्ति
# -परिवर्तनाचे व्यवस्थापन

लेखक

साहेबराव शा. जवंजाळ

प्रकाशन : ई साहित्य प्रतिष्ठान

# आध्यात्मिक क्रान्ति-परिवर्तनाचे व्यवस्थापन


लेखक... साहेबराव शा. जवंजाळ

साकार अपार्टमेंट,१४५ अंबाझिरी हिलटॉप नागपूर ४४००३३
फोन नं .०७१२ २२२६०३४/ मोबाईल ९३२५५०५०३७



या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण व नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957 read with Sections 43 and 66 of the IT Act 2000. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.



## ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.in
www.esahity.com
esahity@gmail.com
eSahity Pratishthan
eleventh floor
eternity
eastern express highway
Thane. 400604

**प्रकाशन : २५ जानेवारी २०२१**



©esahity Pratishthan®2021

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.

**लेखक परिचय**




साहेबराव शामराव जवंजाळ

जन्मतारीख : २६ ऑक्टोबर १९४५ ; काटोल जि.नागपूर

हल्ली मुक्काम व पत्ता - साकार अपार्टमेंट,१४५ अंबाझिरी हिलटॉप नागपूर ४४००३३

फोन नं .०७१२ २२२६०३४/ मोबाईल ९३२५५०५०३७


शिक्षण :

एस.एस.सी पर्यंत बी.आर.हायस्कुल काटोल

बी.एस.सी. (मोहता कॉलेज व हिस्लॉप कॉलेज नागपूर)

बी.एस.सी.टेक(लक्ष्मीनारायण इंस्टिट्यूट ऑफ टेक्नालॉजी नागपूर)

व्यवसाय :

निवृत्त उपनिर्देशक,खादी ग्रामोद्योग कमिशन (भारत सरकार)

महात्मा गांधी व आचार्य विनोबा भावे यांची कर्मभूमि असलेल्या वर्धा येथील खादी ग्रामोद्योग कमिशन अंतर्गत ग्रामोद्योग अनुसंधान संस्था (महात्मा गांधींनी स्थापन केलेली ) येथे २५ वर्षे वास्तव्य.

साहित्य :

१.नागपूर पत्रिका (नागपूर टाईम्स ग्रुप) नागपूर या वर्तमानपत्रातुन १९८० ते १९९१ या काळात समाजव्यवस्था(८ लेख),मानवविकास व अध्यात्म (६लेख),कृषी व उद्योगाचे व्यवस्थापन(६ लेख), संत्रा प्रक्रिया उद्योग(६ लेख), कृषी(३लेख), कृषीउद्योग(६लेख)

या विषयावरील एकुण ३५ लेख प्रसिद्ध झाले.

२.जागृति (ग्रामिण औद्योगिकीकरण यावरील खादी ग्रामोद्योगाची मासिक पत्रिका) यातुन लेख प्रसिद्ध.

३.भगवदगीतेची विशेष आवड.संपुर्ण भगवदगीता मुखोद्गत .

*"भगवदगीतेतील मुख्य विषयावर दृष्टिक्षेप " ही लेखमाला विविध आध्यात्मिक ग्रुपवर (WA) पोस्ट होते.

*अखिल भारतिय गायत्री परिवार नागपूर येथे "विज्ञान व अध्यात्म" या अंतर्गत भगवदगीता विषयावर भाषण

४.भगवदगीता-"परिवर्तनाच्या व्यवस्थापनाचे तत्त्वज्ञान" हे पुस्तक प्रकाशित झाले.

***********

*नागपूर पत्रिका (नागपूर टाईम्स ग्रुप नागपूर ) वर्तमानपत्रात प्रसिद्ध झालेले लेख :(१९८० ते १९९१)

*समाजव्यवस्था

१.तर भारत विकसित राष्ट्र होईल.

२.मानवशक्ती आणि शाश्वत समाजव्यवस्था

३.समृद्धि व रोजगार

४.भारताची गरिबी आणि आहार

५.समृद्ध राष्ट्रासाठी ग्रामसमृद्धि आवश्यक

६.ग्रामिण विकास आणि तंत्रज्ञानाचा प्रवाह

७.ग्रामिण क्षेत्र आणि व्यावसायिक अभ्यासक्रम

८.प्रत्येक खेडे शहर झालेच पाहिजे

*मानवविकास व अध्यात्म

१.मानवी विकासाचा आधार

२.स्वअस्तित्व जाणले तरच विकास

३.स्वतःचे ज्ञान हेच अध्यात्म

४.सत्याची अनुभुति हाच विकास

५.हातुन मोठी कामे केंव्हा होतात

६.अहंकाराची नव्हे निर्णयसामर्थ्याची गरज

*कृषी व उद्योगाचे व्यवस्थापन

१.समतोल विकासासाठी विकेंद्रिकरण

२.यशस्वी विकेंद्रिकरणासाठी एक्स्चेंज पद्धति

३.ग्रामिण उद्योगाचे व्यवसाय संघटन

४.कृषी उद्योगाची संघटनात्मक रचना

५.सहकार चळवळीचा मार्ग

६.विदर्भातील सहकारी चळवळ-कांही उपाय

*संत्रा प्रक्रिया उद्योग

१.संत्रा प्रक्रिया उद्योगाचे जाळे

२.संत्रा उद्योग संयंत्रणा

३.संत्रा उत्पादक ते ग्राहक संयंत्रणा

४.आदर्श संत्रा उद्योग

५.संत्रा प्रक्रिया उद्योगात प्रथम पाऊल

६.संत्र्याची औद्योगिक उत्पादने

*कृषी

१.शेतीचे प्रश्न आणि सोडवणुक

२.पिकलं नसेल तर लुट नाहीतर लयलुट

३.ग्रामोद्योग विकास साधला तरच शेती जगेल

*कृषीउद्योग

१.विदर्भात प्रक्रिया उद्योग शक्य

२.भारताचा अनमोल नैसर्गिक ठेवा-कडुनिंब

३.सरकी प्रक्रिया उद्योग

४.सुगंधी द्रव्य उद्योग

५.विकेंद्रित फळे व भाज्या प्रक्रिया उद्योग

६.साबण उद्योग

# मनोगत-आभार

मानवी जीवनाच्या तत्त्वज्ञानाचे मुळ भगवदगीता ज्ञान आहे .समाजात,मनुष्यजीवनात प्रश्न निर्माण होतात.हे प्रश्न सोडविण्यासाठी भगवदगीतेचा कसा उपयोग करता येईल ,याचा परामर्श "आध्यात्मिक क्रान्ति"(-परिवर्तनाचे व्यवस्थापन ) व (भगवदगीता-) "जीवनाच्या व्यवस्थापनाचे तत्त्वज्ञान" या दोन पुस्तकातुन घेतलेला आहे.

माझे बंधुतुल्य मित्र डॉ.रमेश सालकर यांचे वडील (स्व.) डॉ.गोविंदराव सालकर यांची संपुर्ण भगवदगीता मुखोद्गत होती.हीच गोष्ट माझ्यासाठी प्रेरणादायी ठरली ज्यामुळे मी भगवदगीतेकडे आकर्षित झालो.त्यांचा मी आभारी आहो.

वर्तमानातील प्रश्नाचे आकलन व्हावे व प्रश्नाची सोडवणुक करता यावी यासाठी ज्यांनी ज्ञान संपादन केले (४ पदवी,४पदव्युत्तर डिप्लोमा व १३ विषयात पदव्युत्तर पदव्या) असे उच्चविद्याविभुषित पंडीत माझे बंधुतुल्य मित्र श्री दिगांबर उपाख्य पंडीतराव म.आळशी यांचेशी या विषयावर सतत चर्चा होते.त्यांचा मी आभारी आहे.

या पुस्तकांचे संपादन करण्यासाठी डॉ.सौ.संगितताई अरुण खुरद यांचे मोलाचे सहकार्य लाभले.त्यांचा मी आभारी आहे.

युवापिढीसाठी निश्चितच प्रेरणादायी ठरणाऱ्या पुस्तकांचे महत्व जाणुन श्री.सुनील सामंत प्रकाशित करीत आहे , त्यांचा मी आभारी आहे.

सर्वात शेवटी माझे कुटुंबिय माझी पत्नि सौ.पद्मा साहेबराव जवंजाळ,माझ्या मुली डॉ.सौ.वैशाली मनोज पेठे,डॉ.अनुराधा प्रशांत अलोणे,डॉ.सौ.अनुपमा अनुप जुनघरे यांचे मला सतत सहकार्य लाभले.त्यांचा मी आभारी आहे.

**साहेबराव शा.जवंजाळ** **नागपुर**

# अर्पणपत्रिका

माझे वडील स्व.श्री.शामराव या.जवंजाळ यांच्या पुण्यस्मृतिस समर्पित



# प्रस्तावना

## आध्यात्मिक क्रान्ति :

हे विश्व सुंदर आहे आणि या सुंदर विश्वात मनुष्यजीवन सर्वात सुंदर आहे.म्हणुन या जीवनाचा बंधु व्हा,त्याचा शत्रु बनु नका हा भगवदगीतेचा संदेश आहे.जो समाज व जे राष्ट्र बौद्धिक आणि मानसिक द्रुष्ट्या सक्षम बनत रहाते, त्याचे अस्तित्व आणि प्रगती ही अबाधित रहाते !

परिवर्तन कां ?

"Born to win but conditioned to loose"

मनुष्याच्या जीवनाचा पाया मजबुत होण्यासाठी "संस्कार" या शब्दाचे समाजात प्रयोजन असते.याच पायावर मनुष्याच्या जीवनाची इमारत उभी होत असते.हाच पाया जीवनयात्रेत भयाचा प्रभाव आहे कि,साहसाचा,विश्वासाचा प्रभाव आहे ?हे ठरवीत असते.

मानसिक आणि बौद्धिक खच्चिकरण झालेल्या जनतेवर राज्य करणं कोणत्याही सत्तेस सहज शक्य असतं. बुद्धी गहाण ठेवत मनाचा ताबा दिला की आपण आपले रहात नाही. जशी गुलामाला गुलामीच्या पलिकडे जगण्याची जाणीवच नसते तशीच मानसिक अवस्था बौद्धिक खच्चिकरण झालेल्यांची असते.निरर्थक, निरूत्पादक आणि निरूद्देशी आयुष्याची संवय होते. आपली गुणवत्ता तर वाया जातेच पण आपली स्वायत्तता सुद्धा गायब होते !येथे अज्ञानामुळे स्वतःचा शत्रु बनला असतो.

"अज्ञानेन आवृतं ज्ञानं तेन मुह्यन्ति जन्तवः ।"(गीता)

"ज्ञान" या विषयासंदर्भातच भगवदगीता जगासमोर आली.जगात ज्ञानविज्ञान श्रेष्ठ आहे हा संदेश भगवदगीता देत आहे.ज्ञानविज्ञानाचा वापर करुनच जगाने नवे आधुनिक रुप धारण केले आहे.

मनुष्याला वर्तमानात सुखी जीवन जगायचे असते. जगातील युवापिढी विद्या(शिक्षण) घेत असते,जेणे करुन विद्येचा उपयोग आपल्या विकासासाठी करता यावा. जीवनमार्ग विकासमार्ग

असतो.याच मार्गात अर्जुनाला संशय येतो,तो दुःखी होतो व दुःखाला हुलकावणी देण्याचा प्रयत्न करतो.या प्रयत्नात आपली योग्यता सिद्ध करण्यासाठी धर्मज्ञान सांगतो.यातुनच भगवदगीतेचा "ज्ञान" (जीवनविद्या) हा विषय जन्म घेतो.येथेच जीवनातील ज्ञानाचा श्रद्धा,धर्म,अध्यात्म यांचेशी निश्चित संबंधाचा भगवदगीता परामर्श घेते.

श्रद्धा आणि ज्ञान :

जगात अनेक धर्म आलेत.त्या त्या धर्माप्रमाणे मनुष्याच्या देवता( देहधारी form) असतात.या देवतांवर लोकांची श्रद्धा असते.

यजन्ते सात्त्विका देवान् यक्षरक्षांसि राजसा।

प्रेतान् भूतगणांश्च अन्ये यजन्ते तामसा जनाः॥(गीता )

जगातील सर्व लोक श्रद्धाळु असतात.कुणाची देवावर (ईश्वरावर) श्रद्धा असते,कुणाची शक्तिमान कुबेरासमान (ऐश्वर्यवान) व्यक्तिवर श्रद्धा असते,तर कुणाची भूतप्रेतशक्तिवर श्रद्धा असते.याच श्रद्धेमुळे कालबाह्य व विपरीत ज्ञानाला चिकटुन असणे यालाच अंधश्रद्धा म्हणुन समाज ओळखतो.या अंधश्रद्धेमुळे अज्ञान असते. स्वतःच्या बुद्धिचा योग्य वापर करीत नाही.यामुळे धर्म या विषयालाही अंधश्रद्धा ठरवुन त्याला कालबाह्य ठरविण्यात आले.हा इतिहास आहे.याच पार्श्वभुमिवर अज्ञान निर्मुलनासाठी "अंधश्रद्धा निर्मुलन" हे मिशन जगात चालत असते.प्रत्यक्षात या मिशनचा आधार अज्ञान निर्मुलनाचा असतो.

"श्रद्धावान लभते ज्ञानं "

मनुष्याला बुद्धि आहे व बुद्धिचा योग्य वापर होण्यासाठी अध्यात्मज्ञान आहे.कर्म करतांनाच अर्जुनाला मार्गात संशय येतो.हा संशय दुर होणे आवश्यक असते.यासाठीच जीवनात ज्ञानाचे महत्व श्रीकृष्णाने सांगितले व "ज्ञानी" या संदर्भातच मनुष्यजीवनात ईश्वराचे ज्ञान सविज्ञान सांगितले.कर्माद्वारे या अव्यक्त ईश्वराची भक्ति याचे ज्ञान सांगितले,यामुळे कर्मनिष्ठा (Determination)असते. ज्ञानी या संदर्भात जीवनात ईश्वराचा आश्रय महत्वाचा असतो.या ज्ञानाला अध्यात्मज्ञान म्हटलेले आहे .("स्वभाव अध्यात्म उच्यते") मनुष्यजीवनाचे याच ईश्वराशी कायमचे नाते असते.

महाभारतातील लढाई शोषणाविरुद्ध असली तरी भगवदगीतेतील लढाई मनुष्याचा आंतरिक लढा (Internal battle) असतो.अर्जुनाचा हाच लढा आध्यात्मिक क्रान्ति ठरतो.

"तस्मात् सर्वेषु कालेषु माम् अनुस्मर युध्य च।"

जीवनात ज्ञानाचा आश्रय करुन (ज्ञानसञ्छिन्नसंशयम्) कार्याचा निश्चय करणे.कार्याद्वारे याच ज्ञानरुपी ईश्वराची भक्ति करणे(योगसंन्यस्तकर्माणं) ज्यामुळे जीवनातील दुर्बलतेवर,दुःखावर मात होते.कारण सर्व कर्माचे अखेर या ज्ञानातच(ज्ञानरुपि ईश्वरात ) विलिनिकरण होते.

सर्वकर्मअखिलं पार्थ ज्ञाने परिसमाप्यते।(गीता)

जीवनातील अज्ञान निर्मुलनासाठी भगवदगीता याप्रमाणे आध्यात्मिक क्रान्तिचा संदेश देते.

परिवर्तनाचे व्यवस्थापन :

समुद्रातील भरती-ओहोटीप्रमाणे समाजात चढउतार (Rise&Fall) जाणवत असतात.जेंव्हा समाजातील सर्व शक्ति संपली व परिवर्तन अशक्य आहे असे सामान्य लोकांना वाटते,तेंव्हा महामानव क्रियाशिल असतात, यामुळे समाजात प्रभावी ठरतात.

"या निशा सर्वभूतानां तस्यां जागर्ति संयमी।"(गीता)

अर्थात सर्व जग झोपलेले असते तेंव्हा महामानव जागे असतात.ते उत्तर शोधत असतात.सक्रिय असतात.

"यदा यदा हि धर्मस्य ग्नानिर्भवति भारत" (गीता)

अर्थात जगातील चांगलेपणा(साधु,दैवी संपत्ति) दुबळा ठरतो व वाईटपणा (दुष्कृत्य करणारे,असुरसंपत्ति) प्रभावी असतो तेंव्हा धर्मस्थापनेची गरज असते अर्थात परिवर्तनाची गरज असते.याच धर्मस्थापनेचे ज्ञान आध्यात्मिक क्रान्तिद्वारा भगवदगीता स्पष्ट करते.ही क्रान्ति जाणुन घेण्यासाठी श्रीकृष्णाची भूमिका जाणणे आवश्यक आहे.

प्राचिन काळात यज्ञ करुन देवतांचे पुजन करणे व याप्रमाणे देवता व प्रजा(लोक) यांचे परस्पर सहकार्य घडवुन आणणे ,या उद्देशाने यज्ञाचे महत्व होते.

"सहयज्ञाः प्रजा सृष्ट्वा पुरा उवाच प्रजापति।" (गीता)

महाभारत काळात पाऊस पडण्यासाठी इंद्रपुजा अस्तित्वात होती.श्रीकृष्णाने इंद्रपुजा बंद करवुन गोवर्धन पुजा अर्थात गोवर्धन पर्वताचे वृक्षारोपणाने संवर्धन ही प्रथा सुरु केली.हीच क्रान्ति असते.प्रस्थापित देवतांना झुगारल्यामुळे ते नाराज होतील हे लोकांचे भय श्रीकृष्णाने दुर केले.श्रीकृष्णाची भूमिकाच विधायक क्रान्तिकारकाची आहे ,हे येथे स्पष्ट होते.याच विधायक क्रान्तिचे बीज भगवदगीतेत आढळते.अर्थात ज्यामुळे निश्चित व सकारात्मक उत्तर मिळते,यासाठी "आध्यात्मिक क्रान्ति " असा शब्दप्रयोग येथे केलेला आहे.

"The present system cannot be changed unless it is replaced properly."

काय चुक आहे? हे सांगणारे "ज्ञानी" एक शोधाल तर हजारो मिळतील पण काय योग्य आहे हेReplacement देणारे विधायक क्रान्तिकारी ठरतात.ही विधायक क्रान्ति परिवर्तनाचे व्यवस्थापन ठरते.याच संदर्भात आध्यात्मिक क्रान्ति परिवर्तनाचे व्यवस्थापन ठरते.

स्वतःच्या योगक्षेमासाठी स्विकारलेल्या कार्याद्वारा समुहकल्याण,जगतकल्याण साधावे अशी व्यवस्था निर्माण होण्यासाठी समाजव्यवस्थेचे आध्यात्मिक व्यवस्थापनाचे तत्त्वज्ञान जाणणे आवश्यक असते. शोषणमुक्त समाजव्यवस्थेसाठी आध्यात्मिक समाजव्यवस्था व त्याचे तत्त्वज्ञान यांत स्पष्ट केले आहे.

*** *** ***

आध्यात्मिक क्रान्ति
-परिवर्तनाचे व्यवस्थापन
(CHANGE MANAGEMENT)
या पुस्तकावरील तज्ञांचे अभिमत

श्री.सुधीर ठाकरे (I.A.S )
माजी अध्यक्ष,महाराष्ट्र लोकसेवा आयोग

MESSAGE

This document is a lucid blend of practicing spirituality with mundane human activities that inspires a harmony amongst 3H ; Head, Heart & Hand.

It initiated with a message of “Walk the Talk” citing a verse by Sant Tukaram and take readers to educate as to how to tread the path of salvation stepping from acquiring information, converting it to knowledge , applying it for betterment of humanity in varied associations of the individual from family, community, society, nation to world.

It thus covers the processes of how to Inform , Reform, Perform and Transform oneself as preserved in various texts & actually preached and practiced by great minds in the universe .

A rare book to get a glimpse of all these aspects in a nutshell.

I think the book will be useful to all who desire of following these principles.

Wish all the success to the thoughtful book by Mr. Jawanjal.

Sudhir Thakre.(IAS retd.)
Former Chairman, MPSC.

# आध्यात्मिक क्रांती

–परिवर्तनाचे व्यवस्थापन

(*CHANGE MANAGEMENT* )

साहेबराव शामराव जवंजाळ

# अनुक्रमाणिका

------------------------------------------------------------

*अ .न* *पेज नं*

------------------------------------------------------------


१. वर्तमान व परिवर्तन -----------------(१७ )

**१. वर्तमानातील ज्ञानविज्ञान** दृष्टी **:------(**१७ )

**२.वर्तमानातील विकास**दृष्टी **: ------(२६)**

**३.** परिवर्तन **------------------(२८)**

२ आत्मनो मोक्षार्थ जगतहिताय च -----------(३५)

**(आध्यात्मिक व्यवस्थापन)**

१ आध्यात्मिक क्रांतीचा **संदेश --------(३५)**

(आत्मनो मोक्षार्थ जगत हिताय च)

२. **परिवर्तन** --------------------( ३८)

**३** परिवर्तना**चे (आध्यात्मिक) व्यवस्थापन-**‸**(४५)**

# १.

# वर्तमान व परिवर्तन

*( Every generation needs a new REVOLUTION )*


**१. वर्तमानातील ज्ञानविज्ञान** दृष्टी :

**१.१)भाष्य व भाष्याचे संदेश**

**१.२)** समाजातील स्वमतांधता

१.३).प्रश्नाचे निदान :

१.४) महामानवांचे संदेश, अंधश्रद्धा व **ज्ञानविज्ञान**

**१.५)भगवद्गीतेतील ज्ञानविज्ञान**

**२.वर्तमानातील विकास**दृष्टी :

३ परिवर्तन

३.१)दृष्टीबदल- ज्ञान (प्रकाश )

**३.२)-पातळीबदल (**Transformation/**)**


## १)वर्तमानातील **ज्ञानविज्ञान** दृष्टी :

*"The object of knowledge is what exists and its function to know about reality."-Plato.*

प्राचीन काळाच्या तुलनेत आजच्या काळात मनुष्याला विकासासाठी प्रचंड संधी उपलब्ध झाली,अधिकार उपलब्ध झालेत,ज्ञानविज्ञानाची दालने उघडी झालीत.विज्ञानामुळे प्रश्नाचे निदान होते.ध्येय ठरविता येते.व्यवस्थापन दृष्टीमुळे मार्ग ठरविता येतो. जीवनमार्गाचे संचलन,समुहाचे संचलन यात व्यवस्थापन ज्ञानाचे दर्शन होते.यशस्वी संचलनात व्यवस्थापन ज्ञानाचे रहस्य असते. समाजातील सकारात्मक बदल विकास असतो. हा बदल होण्यास विकासाची वैज्ञानिक दृष्टी कारण असते.

मनुष्य विविध समुहमंचावर जगत असला तरी त्याला स्वतःचाच मार्ग चालायचा असतो.हे समुहमंच आपसात छेद करतात,व मनुष्य बंधनात सापडतो.यामुळे संभ्रम होतो.अज्ञानामुळेच संभ्रम होतो तर हा संभ्रम दूर होण्यासाठी जीवनात ज्ञानी होणे प्रत्यक्ष जीवन जगण्यात वैज्ञानिक दृष्टीची धारणा ठरते.विज्ञानाच्या विकासामुळे समाजात वैज्ञानिक दृष्टी आली आणि यामुळे अंधश्रद्धेवर मात करणे शक्य झाले पंरतु या विज्ञानयुगातही जेंव्हा व्यक्तिगत किवा सामाजिक प्रश्न अनुत्तरीत आढळतात तेंव्हा प्रश्नाचे निदान न करता समर्थनाचा वापर होतो म्हणून ही भूमिका वैज्ञानिक दृष्टी( ज्ञानी) ठरत नाही तर प्रज्ञावादी भूमिका ठरते.

आज जगात ज्ञान उपलब्ध झाले तरी ज्ञानी दृष्टी असेल तरच ज्ञान जीवनात उपयोगात येते. मनुष्याला उपलब्ध संसाधनाची ओळख नसणे,त्याचा उपयोग करण्याचे ज्ञान नसणे,याचाच अर्थ ज्ञानी दृष्टी नसते. प्रज्ञावादामुळे (स्वतःच्या मताचे समर्थन व इतरावर दोषारोपण) प्रश्न सुटत नाही तर संभ्रमाचे कारण ठरत

असते.व्यवहारात मतभेदाचे कारण ठरते.वातावरणात भ्रामक, नकारात्मक विचार(अंधार ) पसरवणारा हा रोगच(**Viral**) ठरतो. याच रोगाने कैकयी(रामायण)वर आक्रमण केले. या रोगाची ओळख करून त्यापासून स्वतःला सूरक्षीत करणे आवश्यक असते.यासाठीच दृष्टी ज्ञानी हवी.

## १.१)भाष्य व भाष्याचे संदेश (Wisdom of Communication):

*Great thoughts speak only to the thoughtful mind, but great actions speak to all mankind-Theodore Roosevelt*

प्रत्येक शब्दाचा तसेच भाष्याचा संदेश मनुष्याला मिळत असतो. जसा संदेश मिळतो तशी दृष्टी बनते.जसे विचार तशी दृष्टी व जशी दृष्टी तशी सृष्टी,(जग)असते.याप्रमाणेच जशी सृष्टी तशी दृष्टी व,जशी दृष्टी तसे विचार असतात.याचाच अर्थ मानवाचे विचार,त्याचे जग(सृष्टी) व त्याची दृष्टी याचे दृढ नाते असते. समाजात चुकीचे संदेश गेले तर चुकीच्या विचाराची बुद्धीत पेरणी होते.जशी पेरणी होते तसे उगवते. बुद्धीचा सक्षमपणे वापर होण्यासाठी कृती (कर्म) व उक्ती (ज्ञान) यांचे नाते व महत्व जाणणे आवश्यक ठरते.

**'बोले तैसा चाले त्याची वंदावी पाऊले "** मनुष्य जीवनात कृती व उक्ती यांचे नाते व महत्व या उक्तीमुळे स्पष्ट होते . मनुष्य जीवनात कृतीचे जग महत्वाचे असते. जी उक्ती सुखदायी साहस देणारी सकारात्मक ,कृतीला पोंषक असेल तर उक्ती ज्ञान होईल. कारण उक्तीचा संबंध ज्ञानाशी जोडल्या जातो. जगणे या संदर्भात प्रत्यक्ष कृती व ज्ञान या संदर्भात उक्ती ठरविली तर ज्ञान कृतीसाठी पोषक असावे.उक्ती कृतीला पोषक असेल तर उक्ती ही कृती होईल.

कृतीचे महत्व जाणणारे उक्तीमध्ये कला वापरून त्याची कृती बनवतो,.याचे ज्ञान नसेल तर उक्ती निरर्थक. नकारात्मक. अडथळा करणारी ठरू शकते. कारण स्वतःचे मनोरंजन किंवा स्वार्थसिद्धी या उक्ती मागे हेतू असतो.कृती व उक्ती,उक्ती व ज्ञान यांचे नाते अर्थात कृती व उक्ती या संदर्भात कर्म व ज्ञान यांचे मनुष्य जीवनातील नाते भगवतगीतेत स्पष्ट झालेले आहे.जीवनातील कार्याचे महत्व हाच भगवतगीतेचा विषय आहे.

**भाष्यकार :**

गोष्ट : *एक साधू रस्त्यावर झोपतो.शिपाई त्याला शिवीगाळ करून हटकतो,.साधू त्याचेकडे पाहून ' तरीच 'म्हणतो व पून्हा झोपतो.शिपाई अधिकाऱ्याला घेऊन येतो. अधिकारी म्हणतो ,ही जागा झोपेसाठी नाही ,धर्मशाळेत जायला सांगतो.साधू वर पाहतो तरीच म्हणून पून्हा झोपतो,तेव्हा राजाला बोलवून आणतात.राजा म्हणतो,महाराज आपल्याला काय त्रास आहे.अशी राजा विचारणा करतो.साधू वर पाहून तरीच म्हणतो.तेव्हा शिपाई,अधिकारी म्हणतात आम्हालाही हेच उत्तर दिले.साधू म्हणतो.पहिला आला ,मला जरब दिली.मी याला ओळखले,हा शिपाई आहे.दुसरा आला, याने कायदा दाखविला,मी ओळखले,हा*

*अधिकारी आहे.आपण माझा त्रास जाणला,मी ओळखले आपण राजा आहात. आता मी कारण सांगतो, धर्मशाळेपेक्षा हा रस्ता स्वच्छ आहे.शिपाई व,अधिकारी यांचे भाष्य एकतर्फी होते,तर राजाने साधुला संवादाची संधी दिली.भाष्यावरून साधूला भाष्यकाराची ओळख झाली..*

मनुष्य आपल्या कृतितून जगाला ओळख देत असतो तसेच उक्तीही (भाष्य ) त्याची ओळख देत असते.भाष्यातून भाष्यकार ओळख देतो.जगात जे घडत असते ती घटना व जे बोलतो, ऐकतो ते शब्द यातून जगात संदेश जात असतात.

**भाष्यकला(ART)** :

**अ) सकारात्मक व नकारात्मक भाष्य** :

*गोष्ट–प्राचीन भारतात स्वयंवर प्रथेनुसार राजकन्येला वर निवड**ण्या**चा स्वतःला अधिकार होता.विद्योत्तमा या राजकन्येला आपल्या विद्येवर गर्व होता.विद्योत्तमाने स्वयंवरासाठी अट जाहीर केली.या अटीप्रमाणे जो राजकुमार तिला वाङ्मयात (भाष्य ) हरवेल ,त्यालाच ती वरमाळ घालणार होती. स्वयंवराला आलेले सर्व राजकुमार हरले व अपमानाने होरपळून गेले.त्यांना एक गुराख्याचा मुलगा झाडाची फांदी कापताना दिसला. तो ज्या फांदीवर बसला होता ,त्याच फांदीला कापित होता.राजकुमारांनी विद्योत्तमाला धडा शिकवावा म्हणून याचीच निवड केली. या मुलाला*
*सांगीतले,विद्योत्तमाने प्रश्न केला तर तू खाणाखुणा कर ,ठरल्याप्रमाणे विद्योत्तमापर्यतं निरोप गेला. एक राजकुमार फक्त खुणेने उत्तर देतील.आम्ही त्याचे स्पष्टीकरण देऊ. विद्योत्तमा हरते.या अटीनुसार कथीत राजकुमाराला (पुढे हाच मुलगा कालीदास या नावाने प्रसिद्ध होतो.) वरमाळ घालण्यात आली. आपली फसवणूक झाली हे लक्षात आल्यावर कालीदासाला हाकलून लावले.कालीदासाने विद्या ग्रहण केली व विद्योत्तमाकडे परतला.**'अस्ति कश्चीत वाङ्विशेषः'**'अर्थात'तुला भाष्यमहिमा कळला काय? असे विद्योत्तमा कालीदासाला प्रश्न करते.या तीन शब्दावरून कालीदासाने कुमारसंभवम,मेघदूत व रघुवंशम या तीन कादंबऱ्या लिहिल्या.*

आपण भाष्य ऐकतो व बोलतो.चांगले भाष्य हितावह ठरते तर नकारात्मक व चुकीचे भाष्य अडथळा ठरते.भाष्य कल्याणकारी ,हितावह व्हावे अडथळा करणारे नसावे.कारण भाष्याला उर्जा (vibration)असते.सकारात्मक भाष्य मानसिक शक्ती दर्शवते.तर नकारात्मक भाष्य मानसिक दुबळेपण दर्शवते.नकारात्मक भाष्य या संदर्भात दुसऱ्या महायुध्दाचा इतिहास घडविणारे हिटलर(जर्मनी),चर्चील(इंग्लंड), रूझवेल्ट(अमेरीका) यांची भूमिका लक्षवेधी आहे.सैनिकाच्या भाष्यात निराश,दुबळी मानसिकता आढळली की हिटलर गोळी घालायचा.चर्चील सैनिकाला निवृत्त करायचा.

रूझवेल्टचा एक पाय अधु होता पण हसरा व सकारात्मक व्यक्ती म्हणून प्रसिध्द होता.त्याला अधु पायाची आठवण दिली तरच तो क्रोधीत होत होता.

समाजात सकारात्मक विचाराची पेरणी व्हावी यासाठी डॉ.अब्दूल कलामांनी इश्राइलच्या ॑वर्तमानपत्राचे उदाहरण दिले.वर्तमानपत्रात वरील पानावर सकारात्मक, विधायक बातम्या तर सत्य पण नकारात्मक बातम्या आतील पानावर अशी विभागणी आढळली. विचार वातावरण बनवीत असते.जीवनाची नकारात्मक भूमिका स्वतःलाच आव्हान ठरत असते. निराश व दुबळी मानसिकता हा अदृश्य रोग असतो.याच रोगाची ओळख व निदान रामायण, महाभारत यातून आढळते.मानसिकता बदल या संदर्भात रामायण व महाभारत यातील ॑बुद्धीतील (**Change of Mindset**)बदल हाच विषय लक्षवेधी आहे. रामायणात मनुष्याला हितावह वचन या जीवनमूल्याचे दर्शन आहे तर.मनथरा भाष्य अडथळा करणारे ठरते.मनथरा भाष्य बुद्धीत संशयाची पेरणी करते.यामुळे ॑बुद्धीभ्रम होतो.म्हणून संस्कृति या संदर्भात भाष्याचे योग्य संदेश जाणे काळाची गरज असते.

**ब)समर्थन उपदेश** – समाजात व्यवहार असतो. व्यवहारात प्रज्ञावादी भाष्य,जाहीराती(**Propoganda**),उपदेश चालूच असतात.कुणी निष्क्रीयतेचे समर्थन करतो,तर याचवेळी कुणी आपले हीत साध्य करण्यात व्यस्त असतो.मनुष्य आपले हीत साधण्यासाठी जाहीरातरूपी,उपदेशरूपी भाष्य करतो.समुहात‘आपण ’व ’ते‘या संदर्भात स्वतःच्या पक्षाची बाजू उचलुन धरणे यासाठी समर्थन ऐक्यवादी भाष्य असले तरी विरोधी पक्षासाठी प्रतिक्रियावादी भाष्य असते.यामुळे समाजात प्रज्ञावादी भाष्याचेच(Interpretation) दर्शन होते. धर्म, आदर्श याला आपल्या सोयीने अर्थ देऊन त्याचा प्रज्ञावादासाठी वापर करणे या प्रक्रियेत आदर्शालाच स्वतःच्या हितासाठी खाली आणतो.

आपल्याला जे हवे याचा उपदेश न करता याची गरज निर्माण करणे यासाठी व्यवहारात भाष्यकला, जाहीरातकला(**Art**) चालतात.मनथरेने कैकेयीला उपदेशपर विचार दिला.कैकेयीने तीची जागा दाखवून दिली.आपले विचार कैकेयीच्या गळी उतरविण्यासाठी मनथरेने संवादकला (**Communicatin skill** ) वापरली.कथा सांगून दुबळे(मानसिकता बदल) केले ॑.कैकेयीची बुद्धी अस्थीर झाली व दीनवचन बोलू लागली. मनथरेने कैकेयीला आपल्या पातळीवर आणले.मनथरा आपली हितचिंतक आहे असे समजून तीलाच उपाय विचारला.व रामायण घडले. मनथरेचे भाष्य कैकेयीसाठी अडथळा ठरले.

## १.२) समाजातील स्वमतांधता

***There are no facts,only interpretations***

**प्रज्ञावादी भाष्य (Interpretated knowledge):**

आपली भूमिका योग्य आहे हे पटवून देण्यासाठी ज्ञानाचा वापर करणे हा प्रज्ञावाद असतो.कृती करून 'मी योग्य' याचा अनुभव करणे व कृती टाळली तरी 'मी योग्य' असा प्रज्ञावाद वापरणे यातील निवड हाच भगवतगीतेचा विषय आहे.महाभारतात अर्जुनाला आपल्या कृतीवर विश्वास नसतो.प्रज्ञावाद बोलतो.स्वतःचे समर्थन करण्यासाठी शब्दाचा कीस पाडतो.युद्ध करणे या मुळ विषयावर पडदा पडतो व 'युद्ध करणार नाही 'हा आपला विषय बनवतो.वादसंवादात मुळ विषय व त्याचे समर्थन असे दोन भाग असतात.चर्चेसाठी एखादा विषय निश्चित केला तरी निरोगी संवाद साधण्यात प्रज्ञावादी प्रवृत्तीच (स्वमतांधता)अडथळा ठरत असते व मुळ विषयावर पडदा पडतो.

. 'मी 'या संदर्भात स्वतःला समाधान देण्यासाठी,स्वतःची योग्यता दर्शविण्यासाठी तुलना करून स्वतःचे श्रेष्ठत्व दर्शविणे, इतरांची दुर्बलता दर्शविणे,आपल्या अपयशाचे दोष इतरावर, जगावर ढकलणे ही वृत्ती मी योग्य, इतर अयोग्य अशी भूमिका प्रदर्शीत करते.प्रज्ञावादाला अंत नसतो.विशीष्ट दिशेनेच प्रज्ञावादी भाष्य वळत असते. याच प्रवृत्तीमुळे यश स्वत:कडे व दोष इतराकडे असे भाष्य समाजात चालते.समाजात निरर्थक व भ्रमीत करणारे भाष्य याच वृत्तीमुळे बोलल्या जाते. सामाजिक अंधश्रद्धेचा शिकार याच भाष्यातून होतो.अंधश्रद्धा म्हणजे अंधदृष्टी तर प्रज्ञावादी प्रवृत्ती स्वमतांधता असते.

**स्वमतांधता :** सुखदुःख बुद्धीची मानसिक अवस्था दर्शवते. मानसिक दुर्बलता आली तरी प्रज्ञावादी प्रवृत्तीचा आश्रय करणे याचा हेतू वर्तमानात स्वत:ला दु:खमुक्त (Comfortable)करणे हाच असतो.या प्रवृत्तीमुळे प्रज्ञावादी प्रवृत्ती संवय बनते. पाण्यात गाळ तळावर बसतो, तसे प्रज्ञावादी प्रवृत्तीचे सुख क्षणिक असते.अहंकार या प्रवृत्तीला पक्का करीत असते .याप्रमाणे सुखदुःखाच्या भ्रामक संकल्पना अहंकाराला खतपाणी देत असते.जीवनातील या अज्ञानामुळेच प्रज्ञावादी प्रवृत्ती कायम राहते.याच संवयीची पेरणी बुद्धीत झालेली असते.यामुळे प्रज्ञावादी प्रवृत्ती संवय (प्रकृति)व मानसिक्ता (ज्ञान )याचा संगम बनते व नकळत प्रकृति(conditioned Attitude) बनते.हीच प्रवृत्ती स्वमतांधता बनते. सुखदुःखाच्या भ्रामक संकल्पना (चांगले म्हणावे,तुलना),समर्थन,उपदेश ,अहंकार या चक्रात सापडलेली प्रज्ञावादी प्रवृत्ती स्वत:चा अडथळा बनते.

## १.३).प्रश्नाचे निदान :

प्रश्नाचे निदान झाले तर उपलब्ध ज्ञानाचा उपयोग करता येतो जसे रोगाचे निदान झाले तर औषधाचा उपयोग करता येतो .ही वैज्ञानिक दृष्टी असते. विज्ञान तत्वज्ञान याची उपलब्धता असतांना प्रश्नाचे उत्तर मिळणे अशक्य होणार नाही परंतु मुळ प्रश्नाचे निदानच होत नसेल तर मुळ प्रश्नावर पडदा पडून समाजात असे प्रश्न निर्माण होतात की ह्याचे उत्तर वरवर सोपे वाटत असले तरी शाश्वत नसते व मुळ प्रश्न तसाच कायम राहतो यामुळेच संभ्रम असतो.याच मुद्यावर कोणता काळ चांगला होता किंवा आहे असे तुलनात्मक

भाष्य ही ऐकायला मिळते. समाजात विकास होतो पण नवीन प्रश्न निर्माण होतात.अडचणी, विकास, प्रश्नाची सोडवणूक पूनः प्रश्नाची निर्मिती ही प्रक्रियाच जणू कायम सुरू राहते.

.

वर्तमानात जीवनमार्गात संभ्रम झाला असता प्रश्नाचे निदान करणे व आव्हान स्वीकारण्यासाठी उपलब्ध ज्ञानाचा वापर करणे ही जीवनातील वैज्ञानिक दृष्टी असते.प्रश्नाचे निदान झाले तर चर्चेचा विषय (***Agenda***)ठरतो.ध्येय ठरविता येते. परंतु प्रश्नाचे निदान न करता स्वतःचे समर्थन करण्यासाठी उपलब्ध ज्ञानाचा प्रसंगी पुरातन शास्त्राचा उपयोग करणे यालाच प्रज्ञावादी भूमिका म्हटले .मुळ विषय व त्याचे समर्थन यातील समर्थनाला महत्व देणे प्रज्ञावादी भाष्य असते यामुळे मुळ विषयाला बगल दिल्या जाते. ही अवैज्ञानिक दृष्टी ठरते.तर ज्ञानी मुळ विषयाला महत्व देतो. याच मुद्यावर महाभारतात श्रीकृष्णाने अर्जुनाच्या अज्ञानाचे निदान केले .

मनुष्य समुहात जगत असताना जेव्हा मनुष्यजीवनाला वर्तमान आव्हान देत असतो, तेव्हा जीवनातील प्रश्नाची उकल करतांनाच त्याला सत्याचा बोध होतो. जीवनाचा अर्थ कळतो. स्वतःची ओळख होते.परंतु प्रश्नांना टाळूनच जगण्याचा प्रयत्न होतो. तेव्हा संभ्रम असतो व अज्ञानाचे निदान न करता प्रज्ञावादी (समर्थन करण्यासाठी शाब्दीक ज्ञानाचा वापर) भूमिका घेतो.हा तात्विक चर्चावाद असतो.प्रज्ञावादी प्रवृत्ती मानसिकता बनते,तसेच संवय बनते.व अज्ञानाचे कारण ठरते.प्रज्ञावादी प्रवृत्तीमुळे नकारात्मक भाष्य असले तरी समर्थन करणे,यात प्रज्ञावादी संवय चुकीची संवय ठरते.रोगावर इलाज होतो.पण प्रज्ञावादी संवयीमुळे जीवनातील रोगाचे निदान होत नाही.प्रज्ञावादी प्रवृत्तीला ज्ञानी समजल्यामुळेच मानसिक दुर्बलता कायम राहते. प्रज्ञावादाचा आधार योग्य–अयोग्य हे द्वद्वं असते.जीवनमूल्ये जीवनमार्गातील योग्य–अयोग्य हे बंधन (**Tie**) सोडवतात.तर जीवनमूल्याचे विकृतिकरण याच द्वद्वात अडकवते. जीवनमूल्ये कार्याला प्रेरक ठरतात.जीवनमार्गात उर्जा निर्माण करतात.जीवनमूल्याची धारणा संस्कार बनतो.

## १.४) महामानवांचे संदेश, अंधश्रद्धा व ज्ञानविज्ञान

जगात महामानव झालेत, तसेच भारतातही झालेत.पण त्यांचे संदेश लोकापर्यत कसे पोहचतात हाच भाग ज्ञानाचा असतो.महामानव आपल्या जीवनातून,प्रबोधनातून एकच संदेश देत असतात,पण हा संदेश नजरेआड होऊन अज्ञानाची पेरणी होणे,स्वहितासाठी अंधश्रद्धा पसरविणे,ज्ञानी समजून प्रज्ञावादी भाष्य करणे व ऐकणे यामुळे ज्ञान उपलब्ध असुनही समाज अज्ञानातच (मोह/ निद्रीत अवस्था)वावरत असतो.म्हणून ज्ञानाचे योग्य संदर्भ जाणणे आवश्यक ठरते.

डार्विनने विज्ञाननिष्ठ तत्वावर मानवी उत्क्रांतीचा आलेख मांडला. या आलेखानुसार सक्षमता व दुर्बलता या आधारावर काही पाश्चात्य तत्वज्ञांनी भांडवलशाही(हर्बर्ट स्पेन्सर) व वंशवाद(गोबीन) याचे

समर्थन करून अप्रत्यक्षपणे शोषणाला मान्यता दिली.या विचाराने मोहित होऊन इतिहास घडवू पाहणाऱ्याचे पतनही इतिहासानेच नोंदविले .

*गोष्ट – एक साधक तपश्चर्येला बसलेला असतांना सैतान घाबरतो व आपल्या शिष्यांना तपश्चर्येत बाधा टाकण्याचा आदेश देतो.परंतु साधकांच्या साधनेत भंग होत नाही म्हणून शिष्य सैतानाला आपली असमर्थता दर्शवितात तेव्हा सैतान म्हणतो साधकाचे विचार लोकापर्यंत पोहचू नये यासाठी तुम्ही साधकाचे शिष्य बनून प्रचारक बना.समाजात साधकाची व्यक्तिपूजा होइल.याचाच फायदा घ्या. साधक महाशय आपल्या विचाराचे संरक्षक आहेत, अशी साधकाची प्रतिमा समाजात उभी करा.याद्वारे आपले विचार लोकामध्ये पसरवा म्हणजे सत्य लोकापर्यंत पोहचणारच नाही.ही प्रवृतीच सैतानाचे भाष्य* ***( Satanic Verses )*** *म्हणून जगात प्रसिध्द आहे.*

आपले विचार इतरांच्या गळी उतरविण्यासाठी महामानवांना प्रचाराचे माध्यम (Communicatin tool) करणे,यामुळे चुकीचे संदेश मुख्य संदेशालाच नजरेआड करतात.अज्ञानामुळे अंधविश्वास असतो..व्यक्तिपूजा प्रधान होऊन अज्ञान कायम राहते. जे ज्ञान तत्कालीन भ्रम दूर करण्यासाठी निर्माण होते त्याला आपल्या सोयीने प्रदर्शित करून समाजाला वर्तमानात भ्रमात ठेवणे याला सामाजिक अंधश्रद्धा म्हणता येईल.सामाजिक अंधश्रद्धाच समाजव्यवस्थेतील दोषावर पांघरूण घालून शोषणाचे समर्थन करते.यामुळे मुख्य संदेश लोकापर्यंत पोहोचतच नाही.

अंधश्रद्धेमुळे भ्रम होतो.अंधश्रद्धा आंधळेपणा(अंधार) असतो ,तर ज्ञान प्रकाश असते.अज्ञानामुळे बुद्धी चालत नाही.विश्वास येण्यासाठीच ज्ञान असते. म्हणून बुद्धीचा वापर होण्यासाठी समाजात प्रबोधन होत असते.अंधश्रद्धा निर्मूलन चळवळीचा हेतू स्वतःच्या बुध्दीचे हरण होऊ न देता बुध्दीचा वापर करणे हाच असतो,भगवतगीता यापुढे जाऊन बुध्दी हरण होण्याचे रहस्य सांगते.महामानवांनी श्रद्धेवर आघात केला नाही तर अज्ञान दर्शवून दिले.गाडगे महाराजांनी धर्माचे नावाखाली पसरलेले अज्ञान दूर केले,तिर्थक्षेत्रावर धर्मशाळा बांधल्या.विश्वहिताचे ज्ञान ईश्वराच्याच कार्याचे ज्ञान ठरते.महामानवाचे संदेश विश्वहिताचे असतात.त्यांना महात्मा अशी ओळख मिळते.

## श्रीकृष्णाची क्रांतीकारक भूमिका :(REFORMATION)

***"The secret of change is to focus all of your energy ,not on fighting the old,but on building the new" - Socrates***

जगातील समाजशास्त्रे ,तत्वज्ञान यांचे उद्‌बोधन करणाऱ्या महामानवांनी समाजातील तत्कालीन प्रश्नाचे निदान करून उपाय सूचविले असतात. हे उपाय बदलत्या स्थितीत कालबाह्य ठरण्याची शक्यता

असते.यामुळे परिवर्तनशील असते. परंतु या उपायामागील दृष्टी  लक्षवेधी असते .कारण प्रश्नाचे निदान सत्य असते.म्हणून या दृष्टीला नवीन आकार देऊन वर्तमानाचे आव्हान स्वीकारण्यासाठी साकार करणे शक्य होते .

वर्तमानातील आव्हान स्वीकारण्यासाठी पुरातन शास्त्र शक्ती  होणे गरजेचे असते,जर दुर्बलता ठरत असेल तर शक्ती होण्यासाठी त्याला नवीन आकार देणे आवश्यक असते.जुन्या संकल्पनेतील(पारंपरिक) शक्ती जाणली तर ती शक्ती वर्तमानात उपयोगात आणता येते.पुरातन शास्त्रातील चुका काढणे व शास्त्रातील शक्तीचे ज्ञान जाणणे यातील योग्य निवड वर्तमानाचे आव्हान स्वीकारण्यास समाजाला, मनुष्याला समर्थ करण्यास उपयोगी ठरते. म्हणून पुरातन शास्त्राला नवदृष्टी  देणे ही ज्ञानी (–वैज्ञानिक )दृष्टी ठरते व हीच विकासात्मक दृष्टी ठरत या संदर्भात  श्रीकृष्णाची भूमिका मार्गदर्शक ठरते.

पाऊस पडण्यासाठी यज्ञ करणे ही धार्मिक प्रथा बंद करून पर्वताचे संवर्धन करणे ही  दृष्टी दिली .इंद्र देवाचा राजा,पण याच इंद्राचे भय लोकांच्या  मनातून दूर केले.बदलत्या काळातील आव्हान स्वीकारण्यास मानवाला समर्थ करणे हीच  श्रीकृष्णाची भूमिका आहे. चुका काढणे व 'करण्यास योग्य' ते सांगणे असे दोन प्रकारचे मार्गदर्शन  समाजात आढळते.ज्ञान जाणणारे 'जे करण्यास योग्य 'ते सांगतात.श्रीकृष्णाने लोकांना मुढ ठरविले नाही तर पर्याय दिला. ज्ञानामुळे  पर्याय मिळतो.

## १.५)भगवद्गीतेतील ज्ञानविज्ञान   :

जगातील महामानवांची ओळख झाली तरच त्यांचा संदेश कळतो. महामानवानी एकच संदेश दिलेला असतो.महामानवांच्या या मुख्य संदेशालाच नजरेआड करणे,यामुळे महामानवांची खरी ओळख जगासमोर येत नाही.तशीच ईश्वराची खरी ओळख जाणत नाही  यामुळे. अज्ञान कायम राहते.भगवतगीतेत श्रीकृष्णाने स्वतःची व ईश्वराची ओळख दिली.

**अवजानन्ति माम्  मूढा मानुषीम्  तनुम्  आश्रीतम्**

**परम्  भावम्  अवजानन्तो मम भूत महेश्वरम् .**   (गीता ९–११)

अर्थात जे मला  मनुष्यरूपातच ओळखतात ज्यांना माझी खरी ओळख (वैश्विक शक्ती)नाही .ते स्वतःच अज्ञान ठरतात.ईश्वराचा आश्रय ज्ञानाचा आश्रय व्हावा यासाठी ईश्वर या वैंश्विक शक्तीची ओळख सृष्टीचा संचालन करणारा अध्यक्ष अशी  झाली तर सृष्टीतील व्यवस्थापन तंत्र (यज्ञ रहस्य)कळते.व्यवस्थापन तंत्र कळले तर निरर्थक व सार्थक भाष्य यातील फरक कळतो.याच ईश्वरज्ञानात रमतो त्याला बुध्दियोग मिळतो,जीवनाचे प्रयोजन कळते.विचाराची दिशा बदलते.आध्यात्मिक क्रांतीचे रहस्य जाणतो.. ईश्वराची खरी ओळख जाणणे ,जीवन जगण्याची ज्ञानी भूमिका(जागृत अवस्था)जाणणे,हीच भगवतगीतेची भूमिका आहे.आध्यात्मिक क्रांती ज्ञानाची हीच दृष्टी प्रदान करते.

वर्तमानाचे आव्हान स्वीकारण्यासाठी ज्ञानाचा वापर करून बदल घडवून आणण्याचे पायाभूत तंत्र भगवतगीतेतून श्रीकृष्णाने जगाला सांगितले.भगवतगीतेद्वारे सृष्टी व मानव याचा परस्परसंबंध दर्शवणारे पुरातन शास्त्र सांगून ईश्वरश्रद्धा व यज्ञ तत्वाचा वापर जीवनमार्गाचे व्यवस्थापन करण्यासाठी केला . वर्तमानात विश्वास देणारे ईश्वरज्ञान ज्ञानाने जाणणे,वर्तमानातील आव्हान स्वीकारण्यासाठी ज्ञानविज्ञानाचा वापर करणे हीच भूमिका भगवतगीतेतून मांडली.याप्रमाणे श्रीकृष्णाची भूमिका क्रांतीकारक ठरते.वर्तमानाचे आव्हान स्वीकारण्यास समर्थ होण्यासाठी आध्यात्मिक क्रांतीचा पांचजन्य शंखच जणू श्रीकृष्णाने महाभारत युध्दात वाजविला.समाजविकासासाठी धर्मस्थापनेचे ज्ञान सांगणारा अर्थात समाजव्यवस्थेचे पुनर्निर्माण करणारा क्रांतीकारक अशी श्रीकृष्णाची ओळख ठरते.

**वर्तमानातील सुखी अवस्था( सुखाचा मार्ग) :**

Worry does not empty tomorrow of its sorrow. It empties today of its strength.- Corre Ten Boom

वर्तमानाचे आव्हान स्वीकारण्यास स्वतःला समर्थ करणे यासाठी वर्तमानातील समाधान(Comfortable) व सुखी जीवन (Happiness) यातील भेद जाणणे आवश्यक ठरते.अर्जुन धर्माच्या चक्रव्यूहात सापडला.त्याला स्वतःची भूमिका सुखदायी वाटली नाही व प्रज्ञावाद बोलून मृत्यु बरा ही भूमिका तो घेतो. अर्जुनाचे भाष्य स्वतःची व्यवहारसिद्धी व्हावी यासाठी नव्हते ,तर स्वतःला समाधान मिळावे यासाठी होते.

वर्तमानात समाधान तर हवेच.पण वर्तमान भविष्याची पूर्वस्थितीही (Precondition)असते.मार्गातील विश्वास समाधान असते.संशय भय असते.ज्ञान असलेला स्वतःला सक्षम करतो.स्वतःच्या मार्गाचे ज्ञान नसेल तर भयामुळे कार्य टाळण्याचा प्रयत्न असतो पण प्रत्यक्षात प्रकृतिचे कार्य चालूच असते. याचे मनुष्याला अज्ञान असल्यामुळे वर्तमानक्षण गमावतो. श्रीकृष्णाने सुखी जीवनाचे ज्ञान सांगितल्यावर अर्जुनामध्ये जे परिवर्तन घडून आले तीच आध्यात्मिक क्रांती आहे.

अर्जुनाला कर्मकांडाचा धडा दिला नाही तर जीवनातील कर्मगतिचे ज्ञान सांगितले ज्यामुळे त्याच्या जीवनविषयक प्रगतीच्या संकल्पना स्पष्ट झाल्यात. **नष्टो मोहः स्मृतिर्लब्धवा** अर्थात दुबळे होण्यापूर्वी जी त्याची स्थिती होती ती पूर्ववत आली.व ज्या ज्ञानाच्या अभावामुळे त्यांला संदेह झाला तेच ज्ञान श्रीकृष्णाने दिले. सुखी (Happy)जीवनासाठी जीवनात विश्वास व स्वातंत्र्य अनुभवणे. यासाठी भगवतगीतेत ' बुध्दीची स्थितप्रज्ञ अवस्था 'वर्णन केली आहे..मोहामुळे अर्जुनाच्या बुध्दीचे हरण(संमोह) होते.ज्ञान ऐकले व बुध्दी जागेवर आली **(स्थितो अस्मि गतसंदेहः)** असे अर्जुनाचे भाष्य असते.

## २. वर्तमानातील विकासदृष्टी :

### **विकास** दृष्टी :

विज्ञानाची प्रगती,राजकीय उलथापालथी,लोकसंख्येतील वाढ इत्यादी कारणामुळे सृष्टीत व समाजात बदल होत असतात.हे बदल वर्तमानातील प्रस्थापित व्यवस्थेला,मानवी परस्परसंबंधांना अर्थात मानवी मूल्यांना आव्हान देत असतात. समाजशास्त्रे,तत्वज्ञान असो वा ज्ञानविज्ञान यातील संशोधन नवविचाराचा उदय करीत असते,जेंव्हा हे संशोधन प्रस्थापित धर्म किंवा मुलतत्ववादी विचाराशी लढा देण्याचे कारण ठरते तेंव्हा हा लढाच क्रांती ठरत असतो. समाज व्यक्तीचा बनलेला असतो.म्हणून मनुष्याची यातून सूटका नसते.परंपरा व वर्तमान यातील हा संघर्ष असतो.हा संघर्ष पारंपरिक मानसिकता व वर्तमानात आवश्यक असलेली मानसिकता यातून प्रगट होतो.

विकासाच्या नवीन संकल्पनेमुळे प्रगती होत असते,हे जगातील विकासाचा इतिहास दर्शवितो. प्रगतीसाठीच हा शोध सातत्याने सुरू असतो.विकासाच्या प्रक्रियेत पर्यायी नवीन व्यवस्था जुन्या प्रस्थापित व्यवस्थेची जागा घेते. जुन्या संकल्पनेची जागा नवीन संकल्पना घेते.जुन्या व नव्या संकल्पना यांचा संघर्ष मनुष्याच्या विकासासोबतच विकसित होत असतो.यातून घडलेली विचारसंकल्पना विकास दृष्टी घड्वते.जुन्या प्रवृत्तीनुसार जीवनाची भूमिका (पारंपरिक)असणे ही नैसर्गिक प्रवृत्ती आहे व जग जणू नव्या संकल्पनेसाठी प्रयोग शाळाच असते .या प्रयोगशाळेत जीवनाचा अनुभव असा शिक्षक असतो,जो आधी परिक्षा घेतो ,नंतर धडा देतो.सकारात्मक भूमिकेमुळेच विकासाची दृष्टी लाभते.व प्रयोग विकासाची प्रक्रिया ठरते.

## समाजव्यवस्था **व संस्कृति**

### अ) समाजव्यवस्था

मनुष्याला वर्तमानातील जीवनातील समस्या सोडविण्यास मदत करता यावी व त्याचे जीवन सुंदर बनावे म्हणून त्याच्या वागण्याचे आकलन व्हावे व त्याच्या वागण्याला दिशा देता यावी या हेतुने मनुष्याच्या वागण्याचे शास्त्र (**Behaviorial science**)जगात आले .हे शास्त्र मानववंशशास्त्र ,मानसशास्त्र (मनाचा अभ्यास),मनोविकार शास्त्र(मनोविकाराचा अभ्यास)व समाजशास्त्र, या चार स्तंभावर आधारित आहे.समुहाचे वागणे सामान्य मनुष्याच्या वागणुकीवर परिणाम करते म्हणून समाजव्यवस्थेची भूमिका महत्वाची ठरते तर मनुष्याचे वागणे समुहावर परिणाम करते.म्हणून संस्कृतिची भूमिका महत्वाची ठरते .

विज्ञानाने व्यावहारीक पारदर्शकता आणली . निसर्ग परस्परपूरक आहे.मधमाशी फुलातून पराग गोळा करते फुलाचे बीज करते.सृष्टीला फुलवीत असते.याप्रमाणे सृष्टीत परस्पर सहकार्य असते.समुहाची संस्कृति समुहव्यवस्था घडवीत असते.ही व्यवस्था संस्कार घडवीत असते. व्यक्ती,समुह व सृष्टी यातील परस्पर सहकार्य व विश्वास हा धर्माचा आधार असतो व समाजात संस्कृति बनत असते.संस्कृतिचे दर्शन समुहव्यवस्थेत आढळते.सक्षम जीवनपद्धतीत सामुहिक शक्तीचे दर्शन होते.व्यक्ती व समुह यांची धर्म,संस्कृति शक्ती व्हावी दुर्बलता होऊ नये.

मनुष्याचे जीवन सक्षम व सुखी करण्यासाठीच जगात ज्ञानविज्ञान उपलब्ध झाले .आजमितीला जगात उपलब्ध असलेले ज्ञान विज्ञानाची प्रगती यावरून नजर फिरते तेव्हा जगात अशक्य काहीच नाही असा आशावाद निर्माण होतो.प्राचीन काळात जे चमत्कार वाटत होते,विज्ञानाने प्रत्यक्षात वर्तमानात साकारले.ही वस्तुस्थिती असली तरी वर्तमानात व्यक्ती प्रत्यक्षात जगत असतांना प्रश्न भेडसावतोच.समाजात जर कथित बेरोजगारी,विषमता ,भ्रष्टाचार,हिंसाचार(आंतक) असेल तर हे सदोष समाजव्यवस्थेचे लक्षण असते.यामुळे समाजात संदेहाचे वातावरण निर्माण झाल्यासारखे दिसते.हे संदेह वर्तमानात मानसिक आक्रंदने निर्माण करतात.सदोष समाजव्यवस्थेची ही साक्ष ठरते.

वर्तमानात समाजातील बदल समाजव्यवस्थेला नवीन आकार देत असतात.यामुळे मानसिक आक्रंदने निर्माण होतात.कोण कोणावर उपकार करतो या एकाच मुद्यावर जगात क्रांती झाली.स्वातंत्र्य हेच क्रांतीचे प्रेरणास्थान व प्रेरक शक्ती असते. जगा आणि जगू द्या या तत्वाला पोषक वातावरण होण्यासाठी वर्तमानात स्वातंत्र्याला पोषक अशा संस्कृतीचे स्वागत करणे अपरिहार्य ठरते.अन्यथा बोर देऊन आवळा काढण्याची प्रवृत्ती शोषणाचे कारण ठरते.

सदोष समाजव्यवस्था सामाजिक प्रश्न असतो.समाजात बेरोजगारी, भ्रष्टाचार असला ,अर्थात समाजव्यवस्थेत दोष निर्माण झाला तर समाजात संदेह असतो.समाजातील प्रश्नावर विविध उपाय बोलल्या जातात परंतु प्रत्यक्षात जे घडत असते तेच सत्य स्वीकारावे लागते. यामुळे ज्ञान असूनही त्याचा वापर कां होत नाही हा प्रश्न उपस्थित होतो व समाजातील संभ्रमावस्था दूर होत नाही..याच अवस्थेत व्यक्तीला मात्र वर्तमानाचे आव्हान स्वीकारणे हे त्याचे जगण्याचे दायित्व स्वीकारणे अपरिहार्य असते.

## ब) संस्कृति

***Culture is the intersection of people and life itself. It is how we deal with life,love,death,birth, disappointment...all of that is expressed in culture.-Wendell Pierce***

मनुष्य मुक्तीसाठी जन्माला आला पण चुकीची संस्कृति त्याला बंधनात अडकवते.दुबळे करते.(**Born to win but conditioned to loose**).अंधविश्वासाचे कारण बनते.यामुळे बुद्धीचा सर्जनशील वापर

होण्यापासून वंचीत करते.बाल्यावस्थेतील हत्तीच्या पायात साखळदंड टाकतात.यामुळे तो पळू शकत नाही.पायातील बंधन मानसिक बंधनात परिवर्तित होते.मोठा झाल्यावर नुसते साधे दोरखंड टाकले तरी तो हलत नाही. नीतिमत्तेचे संस्कार या संदर्भात जर्मन तत्वज्ञ नित्शीने संस्कृतितील स्वामित्वाचे संस्कार (**Master Morality**) व गुलामी संस्कार **(Slave/heard Morality)**अशी विभागणी केली.ही विभागणी राजा व प्रजा या संदर्भात लागू होती.जीवनविकासात स्वतःच्या मार्गातील कार्य व निर्णय अधिकार याचे ज्ञान नसणे,(भय,अभाव यामुळे आलेली) मानसिक दुर्बलता हे गुलामी संस्कृतिमागील कारण आढळले.वर्तमानात स्वामित्वाचे संस्कार स्वातंत्र्याच्या संस्कृतिला पोषक ठरते.

मनुष्य जीवनात योगक्षेमासाठी कार्यरत असणे हा व्यवहारअसतो.ही जीवनाची स्वाभाविक(**survival**) पातळी असते.व्यावहारीक जीवनपद्धतीचा आधार अधिकार व कर्तव्य असते.व्यवहारात स्वार्थ,धर्मात परमार्थ यामुळे संस्कृतिचे नांवाखाली पारंपरिक जीवनपद्धतीचा आधार उपकार–परावलंबन बनते,तेव्हा व्यावहारीक पारदर्शकता नष्ट होते.व व्यवहारातील भाष्यात जाहीरातनीतीचा वापर होतो.आदेशाचे पालन करून वागणे हेच केवळ जीवनमूल्य(संस्कार) ठरवतात.याचाच अर्थ यांत्रिकपणे काम करणारे यंत्रमानव तयार होणे यालाच संस्कृति ठरवतात.या जीवनपद्धतीत ज्ञानी समजून आपले विचार लादणे ही संवय जडते आपली दृष्टी(सोच) व्यावहारीक नसून ज्ञानी (हितचींतक)आहे असे भासवून स्वहीत साधण्यासाठी जाहीरातरूपी,उपदेशरूपी भाष्य समाजात (समुह) चालते. नकारात्मक व चुकीचे उपदेशात्मक भाष्य जीवन मार्गात भ्रम निर्माण करते.यामुळे मानसिक दुर्बलता येण्याचाही संभव असतो. बुद्धीभ्रम झाल्यामुळे बुद्धीनाश होतो.मानसिक दुर्बलता हा रोग ठरतो.यामुळे ही जीवनपद्धती(संस्कृति) निरोगी ठरत नाही.

**विकासपोषक संस्कृति(स्वातंत्र्य)** :

स्वातंत्र्याच्या संस्कृतित निर्णय अधिकारच महत्वाचा ठरतो.पशुना योग्य प्रशिक्षित केले तर तेही चाकोरीबद्ध कार्य करतात.मानवाची स्वतंत्र बुद्धीच मानव व पशु यात भेद करते.विकसित समाजात मुलांच्या संस्कार शिक्षणात निर्णय अधिकाराची जाणीव,निर्णयक्षमता यावर विशेष लक्ष देतात.हा संस्कार पोषक ठरतो.याउलट अज्ञानामुळे वा प्रेमापोटी मी तुझ्या भल्याचे सांगतो ही विचार लादण्याची प्रवृत्ती समाजात आढळते.निर्णय अधिकाराची जाण(स्वातंत्र्याचे ज्ञान) नसेल तर परावलंबी असतो.व उपदेश,दुराग्रह समाजात चालत असतो.ही प्रवृत्ती स्वातंत्र्याच्या संस्कृतीला पोषक ठरत नाही. निर्णय अधिकार नैसर्गिक स्वातंत्र्य असते.स्वावलंबन हे जीवनमूल्य स्वातंत्र्याच्या संस्कृतिचा पाया ठरते.यामुळे निर्णय अधिकार मिळतो.

## ३) परिवर्तन

***Everyone thinks of changing the world ,but no one thinks of changing himself.-Leo Tolstoy***

**धूल थी चेहरेपर हम बस आईना साफकरते रहे,उम्रभर बस यही गलती हम बारबार करते रहे.**

प्रत्येक मानवाचे जीवन विशिष्ट कालावधीसाठी या भूतलावर कार्यरत असते, त्याचेसाठी वर्तमानच अती महत्वाचा असतो हे सत्य स्वीकारण्यातच शहाणपणा असतो.विकासाच्या मुख्य प्रवाहात स्वतःला आणणे हे स्वतःचेच दायित्व ठरते.आपला जीवनप्रवास ही आपलीच निवड असते.मनुष्याचा जीवनप्रवास सुखासाठीच चालू असतो. दुःखी राहणे वा सुखी राहणे ही मानसिक स्थिती आहे.कुणी कार्यात आनंद अनुभवतात व सकारात्मक जीवन जगतात तर कुणी दु:खी ,कष्टी राहून नकारात्मक जीवन जगतात .यामुळेच समाजात सुखासाठी प्रतिकुल परिस्थितीची कारणे देऊन अपयश साजरे करणारे समाजात आढळतात,तर प्रतिकुल परिस्थितीवर मात करून जीवनात यशस्वी होणारेही आढळतात.

वर्तमानात जीवनाचे आव्हान स्वीकारण्यासाठी मनुष्याची सकारात्मक भूमिकेची (ज्ञानी)निवड स्वतःची असते.वर्तमानात जगताना सकारात्मक भूमिकेची संवय (मानसिकता)असेल तर आत्मविश्वास असतो.वर्तमानाचे आव्हान स्वीकारण्यास स्वतःची भूमिका सक्षम (सकारात्मक,जीवनमार्ग पक्का असणे )करतो.समुहात परस्परांना सहकार्य करतो. म्हणून स्वतःची भूमिका सक्षम करणे ही स्वतःची जबाबदारी ठरते.

## स्वजीवनाचा पुढारी(जीवनाचे प्रयोजन) :

***You are the HERO of your own story.***

एखाद्याला प्रेरणा स्फुरते व ती प्रेरणा प्रत्यक्ष कार्यातून सिद्ध करीत असतो. येथे 'मी योग्य आहे 'हा आत्मविश्वास ठरतो. तर एखादा नकारात्मक भाष्य बोलला तरी 'मी योग्य आहे 'हे सिद्ध करण्यासाठी प्रज्ञावादाचा वापर करतो. हा अहंकार असतो.समृध्दीवर अनेक पुस्तके प्रसिद्ध होतात .वर्तमानस्थितीत सुधारणा करण्यासाठी समृद्धीसाठी वर्तमानपत्रातूनही लेख प्रसिद्ध होतात. अमुक व्हावे, अमुक करणे आवश्यक आहे अशा आशयाने त्याची समाप्ती होते. इतरांनी काय करावे या विचारात स्वतः काय करावे या विचाराचा विसर पडतो.

आपण जी भूमिका स्वीकारलेली असते तसा आपला जीवनमार्ग चालू असते.आपण कोणती भूमिका स्वीकारावी हा निसर्गदत्त अधिकार मनुष्याला मिळालेला असतो.म्हणून आपला जीवनमार्ग सुखाचा, प्रगतीचा होण्यासाठी योग्य भूमिका स्वीकारणे हा अधिकार मनुष्याला प्राप्त आहे.याच अधिकाराची जागृति

भगवत्गीतेद्वारा श्रीकृष्णाने करून दिली. स्वतःचे कार्यक्षेत्र निवडणे व आपल्या कार्यक्षेत्राचा स्वतःच पुढारी होणे ही विकास भूमिका घेतली तरच उपलब्ध ज्ञानाचा उपयोग होतो.

स्वतः काय करायचे किंवा स्वतःची भूमिका योग्य करणे याची पारदर्शकता येण्यासाठी आध्यात्मिक क्रांती दृष्टी देते.स्वतःच्या मार्गाची जाण असणे हा विश्वास ठरतो.विश्वास नसेल तर प्रज्ञावादी प्रवृत्ती(**Interpretated for advocacy**– तुलना,समर्थन)चा आश्रय करतो. समुहाचा अडथळा वाटणे यात निरोगी संस्कृतिचा अभाव (व्यवस्थादोष,सहकार्य अभाव)अर्थात व्यवस्थापनाचे अज्ञान आढळते.ही अवस्था प्रज्ञावादी (समर्थन) प्रवृत्तीला जन्म देते. 'मी योग्य आहे 'हा प्रज्ञावादाचा आधार असतो.आपण काय करू शकतो याचा विचार न करता जगाने काय करावे या हेतूने अमूक व्हावे,तमूक व्हावे अशी उपदेशात्मक भूमिका आढळते.जे आपल्या अधिकारात आहे,ते टाळून जे अधिकारात नाही त्यावरच भाष्य चालत असते.अर्थात प्रज्ञावादी (प्रेक्षक– **herd morality**) भूमिका स्वीकारतो.ही मानसिकता निरोगी नसते.

मीनु मसानी यांनी १९५० साली एका पुस्तकाव्दारे समृद्ध भारताचे स्वप्न रंगवले.पण कोण करेल?असा प्रश्न करून,याचे उत्तर जर' मी' मिळाले तरच समृद्ध भारतांचे स्वप्न साकार होईल अन्यथा हे पुस्तक स्वप्नरंजन ठरेल असा विचार व्यक्त केला.कोण करेल?याच प्रश्नाचे समर्पक उत्तर स्वामी विवेकानंदाच्या संदेशात आढळते.

प्रत्येक मानवाचे हृदयात ईश्वराचा वास आहे व जग ही व्यायामशाळा आहे.जगाच्या व्यायामशाळेतील खेळाडू व्हावे , नायक व्हावे, हा प्रत्येक व्यक्तीचा जन्मसिध्द अधिकार आहे.या व्यायामशाळेतील खेळाडू बनून नायक व्हायचे की प्रेक्षक व्हायचे ही निवड मात्र स्वतःची असते. जे योग्य वाटते याचा प्राणीही विचार करून जगतात.पण सर्व प्राणीमात्रामध्ये मनुष्यजन्म श्रेष्ठ आहे कारण तोच बुद्धीने काय योग्य काय अयोग्य याची शहानिशा करतो.यातच मनुष्यजन्माचे श्रेष्ठत्व आहे .स्वतःला भेड बकरी समजून प्रेक्षक न राहता वर्तमानाचे आव्हान स्वीकारण्यास सक्षम होण्यासाठी स्वतःमध्ये आध्यात्मिक क्रांती घडवून आणणे हेच स्वामी विवेकानंदाच्या संदेशातील मर्म आहे.

## ३.१)दृष्टीबदल–ज्ञान (प्रकाश ) :

*Vision is the art of seeing what is invisible to others.- Jonathan Swift*

### स्वातंत्र्य,आत्मसन्मान ,आत्मविश्वास व अहंकार यातील पारदर्शकता :

#### अ) स्वातंत्र्याची मान्यता

What light is to the eyes-What air is to the lungs-What love is to the heart,Liberty is to the soul of man.- (10)Robert Green Ingersoll

**निवड अधिकार (मार्गाची व्दिविभागणी)**: मनुष्यजीवन चांगले व वाईट (सत व असत) ,आपण व ते ,सुख व दु:ख,राग व द्वेष अशा विविध द्वंद्वांने भरलेले असते.द्वंद्वांमुळेच मोह असतो. प्रज्ञावादाचा आधार बनतो.द्वंद्वमुक्ती (Action,happiness beyond duality)हाच भगवतगीतेचा विषय आहे.या विषयाचा अंत व्दिविभागणीवर झालेला आहे.

भगवत्गीतेचा शेवट प्रथम व्दिविभागणीत (प्रकृतीवश –आत्मवश) केला.या विभागणीत आत्मविकासासाठी ईश्वरज्ञानाचा आश्रय व अहंकाराचा आश्रय यातील भेद स्पष्ट केला.ज्ञानी पातळीवर ईश्वराने दिलेली कार्यसंधी हे जीवनाचे प्रयोजन जाणणे हेच भाग्य (नियति)ठरते.हेच सत्य ज्ञानी जाणतो. श्रीकृष्णाने जीवनविकासातील विचार स्पष्ट केले ,पण निर्णय तुला घ्यायचा आहे हे अर्जुनाला सांगितले.येथे शास्त्र पूर्ण होते,

वर्तमान भविष्याची पुर्वस्थिती(Precondition) असते.सकारात्मक मानसिकता व मानसिक शक्तीचे महत्व कळते.मानसिक शक्तीच्या (योग)साधनेसाठी स्वतःचा मार्ग ठरवावा लागतो. ंबुद्धीची स्थीरता येण्यासाठी ,सकारात्मक होण्यासाठी ज्ञानी दृष्टी असणे (ज्ञान)हा आध्यात्मिक क्रांतीचा विषय ठरतो,आपला जीवनमार्ग केवळ योगक्षेमपुर्तीचा नसून योगसाधनेचा मार्ग असतो,हे रहस्य उघड होते.स्वतःचा मार्ग कळला तर स्वधर्माचे ,कर्मयोगाचे महत्व कळते.स्वधर्म कळला तर समुहाचे व्यवस्थापन कळते. कार्याचे महत्व कळते.समुहात कार्यासाठी होणारा सामुहिक निर्णय स्वतःचा स्वधर्म करतो.स्वधर्म मार्गातील द्वंद्वमुक्तीचे साधन(Tiebreaker) असते तर कर्मयोगात पक्का निश्चय असतो. कर्मयोग कळला तर पक्का निश्चय कळतो,निर्णयअधिकार,वचन याचे महत्व कळते.

**ब)अहंकार** *vs.* **आत्मसन्मान**

*There are two kinds of pride,both good and bad."Good pride" represents our dignity and self-respect. "Bad pride "is the deadly sin of superiority that reeks of conceit and arrogance.*
*- **John C. Maxwell***

जनमानसात अहंकार या शब्दाचा संदेश गर्व असा जातो. यामुळे जीवनात आत्मसन्मान व अहंकार यात संभ्रम असतो. जीवनातील संभ्रम दूर करण्यासाठीच आध्यात्मिक क्रांतीचे प्रयोजन आहे.आत्मसन्मान जीवनमूल्य अधिष्ठित असतो.व्यक्तीगत विकास किंवा जीवनात उच्च (ज्ञानी) पातळी गाठणे या संदर्भात आत्मसन्मान जीवनविकासातील सकारात्मक प्रवृत्ती ठ.रते,जीवनाला सक्षम करते.तर अहंकार नकारात्मक प्रवृत्ती ठरते.

पाश्चात्य विज्ञानानुसार जागृत मन( *Conscious mind* ),अर्ध जागृत( *Sub-Conscious mind* ) मन व अजागृत मन( *Un Conscious mind* ) बुद्धीची कार्यवाही स्पष्ट करते.जगातील मानसशास्त्री याच ज्ञानाचा उपयोग करतात.भारतीय विज्ञानात हीच कार्यवाही मन,बुद्धी,चित्त व अहंकार याद्वारा स्पष्ट

होते.भगवतगीतेत श्रीकृष्ण व अर्जुन याचे संवादातून याच  विज्ञानाचा आधार जीवनज्ञानासाठी वापरलेला आहे.संवादाचा शेवट जीवनमार्गात बुद्धीमधील अहंकाराचा आश्रय कि ईश्वरज्ञानाचा आश्रय याची निवड करणे या निवडीवर झालेला आहे. बुद्धीमधील अहंकाराची प्रतिस्थापना  ईश्वरज्ञानाने करणे  हीच आध्यात्मिक क्रांती असते.

अहंकारामुळे  प्रज्ञावादी भाष्य करणे मनसमाधान (*Comfortable*)असते. मन,बुध्दी,चित्त व अहंकार हे  चार अंग बुध्दीला कार्यरत ठेवतात.साखर गोड आहे यातील गोड रस बुध्दी जाणत असते,तसेच चित्तसुखही(*Happiness* )  बुध्दी जाणत असते. अज्ञानामुळे बुद्धीचे हरण होते.बुद्धियोगी होऊन जगणे,यातच सुखी *(Happy)*जीवनाचे रहस्य दडलेले आहे.मानसिक शक्तीचा विकास यासाठी  योग म्हटले.म्हणून दु:खमुक्तीचे ज्ञान–स्थीरबुद्धीसाठी योगसाधना असते.हेच बुद्धियोगाचे रहस्य आहे.बंधन दु:ख व स्वातंत्र्य सुख असते. मोक्ष (ईश्वरधाम–अमृत)ही संकल्पना स्वातंत्र्याची आहे. ज्ञानी भूमिकेत वर्तमानातील आव्हान स्वीकारण्याची सक्षमता,जीवनमार्गातील विश्वास,स्वतःच्या स्वतंत्र जीवनमार्गाची व अधिकाराची जाण असते.

**अहंकाराचा आश्रय व ईश्वरज्ञान** :जीवनातील प्रत्येक क्षण भविष्याची पूर्वस्थिती (Precondition)असते.वर्तमानात दुःखात रमणे या अवस्थेत नकारात्मक विचाराला जन्म देतो व वैश्विक शक्तीपासून स्वतःला विभक्त करतो. विचारलहरी(Vibration) नकारात्मक होतात.नकारात्मक विचारलहरीला वश होणे ही  दुर्बलता असते.

प्रकृतीनुसार जीवनाचा प्रवास चालु असतो.मानसिक शक्तीचे (स**कारात्मक** उर्जेचे ज्ञान)अज्ञान असणारा प्रज्ञावादाद्वारे स्वतःला ज्ञानी समजतो तेंव्हा ही अवस्था अज्ञानी ठरते.प्रज्ञावादी  भुमिका अहंकाराचा आश्रय असतो .'मी योग्य आहे 'हा प्रज्ञावादाचा आधार असतो .सकारात्मक विचारलहरी प्रवाहीत होण्यासाठी बुध्दी स्थीर करणे.व यासाठीच बुध्दियोगाचे(Connect with God)  प्रयोजन आहे.(ईश्वर) ज्ञानामुळे दृष्टीबदल होतो.निसर्गाविषयी सकारात्मक दृष्टी असते.

सक्षम या संदर्भात आत्मविश्वास, प्रसन्नता ,सकारात्मक विचार या रूपाने व्यक्तीमत्व व्यक्त होते तर दुःखामुळे  बुद्धी अस्थिर होते व जीवनमार्गात दुर्बलता येते. अस्थिर बुद्धी ,आत्मविश्वासाचा  अभाव, भय,चिंता, संशय,या रूपाने दुर्बलता प्रकट होते .म्हणून सक्षम होण्यासाठी योगसाधना करणे.योगसाधना होण्यासाठी जीवनमार्ग पक्का करणे.या ज्ञानाची उपयुक्तता  स्पष्ट होते. याप्रमाणे मनुष्यजीवनाची सुखी,सक्षम व ज्ञानी अवस्था यांचा परस्पर संबंध असतो व  ज्ञानी जीवनाची उच्च पातळी ठरते.यात कार्याद्वारे योगसाधना करणे याची निवड आहे.

**क)आत्मविश्वास:**

*There is but one cause of human failure, And that is man's lack of faith in his true Self*

विश्वास देणारी शक्ती(Faith growth Harmone)अशी ईश्वरज्ञानाला विश्वातील जनमानसात ओळख आहे.स्वतःला विश्वास येण्यासाठीच ईश्वरज्ञानाचा आश्रय उपयुक्त ठरतो . विषयावर निष्ठा असेल तरच मनुष्य त्या विषयाचे ज्ञान जाणून घेतो. अन्यथा दुर्लक्ष करतो.कार्याद्वारे योगसाधना घडणे या शास्त्रावर विश्वास येण्यासाठी ईश्वरज्ञानाचा आश्रय करणे हे शास्त्र सांगून झाल्यानंतर सर्वात शेवटी परिणामाच्या भयापासून पूर्णपणे मुक्त करण्यासाठी श्रीकृष्णाने अर्जुनाला हितोपदेश केला.संशयामुळे परिणामाचे भय असते.परिणामाची जबाबदारी स्वतः स्वीकारावी लागते.

अपराधिक भावना संशय निर्माण करते.हा संशय बुद्धीभ्रम करतो.म्हणून जीवनमार्गात विश्वास हवा असतो.श्रीकृष्णाने उपदेश करण्यापूर्वी तुझा हितचिंतक म्हणून प्रतिज्ञा पूर्वक सत्यच तुला सांगतो ही ग्वाही अर्जुनाला दिली व परिणामाची जवाबदारी (पापभय)स्वतः स्वीकारली .याद्वारे संपूर्ण विश्वास येण्यासाठीच (.*Guarantee*) उपदेशाचे कारण स्पष्ट होते.अर्थात संपूर्ण विश्वास येण्यासाठीच ईश्वरसमर्पण असते. अहंकाराचा आश्रय प्रकृती असते.जीवनमार्गात ईश्वरज्ञानाचा आश्रय केला नसला तरी प्रकृतीचे कार्य चालूच असते.फरक जीवनमार्गातील द्वंदवश (मनोवश ) व द्वंद्वंमुक्त(आत्मवश )अवस्थेत पडतो. म्हणून भगवद्‌गीतेत शास्त्र व उपदेश यातील पारदर्शकता स्पष्ट झालेली आहे.

शास्त्रविहीन उपदेशाद्वारे लादलेल्या विचारात डुबक्या मारून जगत राहणे अथवा जीवनात शास्त्राचा वापर करून आत्मविश्वासाने मार्गक्रमण करणे याची निवड करण्याचा अधिकारच मनुष्याला प्राप्त आहे.याप्रमाणे आध्यात्मिक क्रांती स्वातंत्र्याच्या संस्कृतीला पोषक ठरते.व या ज्ञानाने दृष्टी बदलते,बुद्धीची गढुळता दूर करून ज्ञानविज्ञान जाणणारी वैज्ञानिक दृष्टी प्रदान होते.

जीवनात ईश्वरज्ञानाचा आश्रय करणे वा न करणे हा मनुष्याचा अधिकार आहे.कारण स्वातंत्र्य हाच आध्यात्मिक क्रांतीचा पाया व कळस आहे. कारण कोणत्या भूमिकेत जगायचे याची निवड आपण स्वतःच केलेली असते. म्हणून गीतेतील ज्ञान उपदेश नसून ज्ञानी भूमिकेच्या धारणेसाठी शास्त्र ठरते.आत्मविश्वास विकसित करण्याचे शास्त्र ठरते.या अधिकाराची जागृती आत्मसन्मान ठरतो.

## ३.२)-पातळीबदल (Transformation/) :

***You can't have a physical transformation until you have a spiritual transformation -Cory Booker***

मनुष्य जरी समुहात, समाजात राहतो तरी तो स्वतःचाच मार्ग चालत असतो हेच सत्य भगवतगीतेतून स्पष्ट झाले.भाष्याची गति कळते.स्वतः जबाबदारीने जीवन जगतो. स्वतःच्या मार्गासाठी ज्ञानाचे प्रयोजन असते. प्रज्ञावादी प्रवृत्ती (**advocacy** ) प्रकृती ठरते,ज्ञान नसते.परस्परसंवादात प्रज्ञावादी प्रवृत्तीच अडथळा ठरत असते.मानवी जीवनातील हीच चुकीची संवय व मानसिकता गीतेने दर्शवून

दिली. जीवनमार्गाचे ज्ञान कळले तेंव्हा अर्जुनाला स्वतःच्या प्रज्ञावादी भूमिकेतील अज्ञानाचे निदान झाले.जीवन जगतांना मनुष्याच्या ज्ञानी भूमिकेत याच वैज्ञानिक दृष्टीचा अंतर्भाव भगवतगीतेत स्पष्ट केला आहे. व ज्ञानी भूमिकेत परिवर्तन करण्यासाठी शाश्वत धर्माचे शास्त्र अर्जुनाला सांगीतले.हीच आध्यात्मिक क्रांती आहे.

भगवद्गीतेनुसार जगाला भवसागर व शरीराला नाव (वाहन) ही संज्ञा दिली तर जो भेद नाव वाऱ्याने वाहणे व नाव वल्हवणे यात आढळतो तोच भेद प्रेक्षक व नायक या भूमिकेसाठी अभिप्रेत आहे.हाच भेद मनुष्याची प्राकृतिक व ज्ञानी भूमिका याद्वारा स्पष्ट होतो.

ज्ञानी नसेल तर ओघानेच प्राकृतिक ठरतो.म्हणून जोवर मनुष्य प्राकृतिक पातळीवर जगत असतो तोवर त्याची भूमिका या जगासाठी प्रेक्षकाचीच ठरते.प्राणीमात्रही मानवाप्रमाणेच नैसर्गिक असतात व प्राकृतिक (सामान्य) पातळीवर जगत असतात.

जगामध्ये नायक –सक्रीय भूमिका म्हणून जगण्यासाठीच मनुष्य जन्माचे महत्व आहे.(सामान्य) प्राकृतिक पातळीवर भौतिक संकल्पना असतात यामुळे मार्गात द्वंद्व असतो. तर आध्यात्मिक क्रांतीचा उद्देश जीवनाची उच्च (ज्ञानी,निर्द्वन्द्व) पातळी गाठणे आहे ज्याद्वारे सुखी होण्यासाठी जीवनमार्ग निवडतो व आत्मविश्वासाने मार्गक्रमण करतो.स्वतःच्या जीवनाचे महत्व जाणून स्वतःची भूमिका जवाबदारीने व समर्थपणे जगणे हाच बदल स्वतःमधील क्रांती ठरते.

------------------

# २.

# आत्मनो मोक्षार्थ जगतहिताय च

## (आध्यात्मिक व्यवस्थापन)


१ आध्यात्मिक क्रांतीचा(आत्मनो मोक्षार्थ जगत हिताय च) **संदेश**

**१.१ आध्यात्मिक व्यवस्थापन**

**१.२.) आत्मनो मोक्षार्थ जगत हिताय च** या संदेशाची वैज्ञानिक दृष्टी

२. **परिवर्तन**

**२.१) समाजव्यवस्थेचे संचलन (विकास)**

**२.२) समाजधारणेत धर्माची भूमिका व आव्हान**

**२.३)समाजव्यवस्थेचे परिवर्तन व योगदान**

३ आध्यात्मिक व्यवस्थापन

**३.१ समाजव्यवस्थेचे आध्यात्मिक व्यवस्थापन** :

३.२ **समाजधारणेतील योजक भूमिका**


## १.) आध्यात्मिक क्रांतीचा(आत्मनो मोक्षार्थ जगत हिताय च) **संदेश**

### १.१ आध्यात्मिक व्यवस्थापन :

प्रत्येक मानवात व्यवस्थापनाचे गुण असतात हे गुण आपण कुठल्या क्षमतेवर वापरतो यावर आपली यशस्विता अवलंबून असते. निरनिराळ्या क्षेत्रामध्ये मनुष्याचे हातून व्यवस्थापन घडते. व्यक्तिमत्व व्यवस्थापन, व्यावसायिक कार्याचे व्यवस्थापन ,देशाचे व्यवस्थापन इत्यादी क्षेत्रात यशस्वी होण्यासाठी गुणवत्ता आणि उपलब्ध संसाधनाचा योग्य मेळ घालून व्यवस्थापन करावे लागते .याप्रमाणे विकासमार्गात व्यक्तीची भूमिका योजकाची ठरते .बौद्धिकज्ञान विकासाची दृष्टी देते. योजक विज्ञानाला कार्यभूमिकेची जोड देऊन विकास घडवून आणतो .जीवनमार्गाचे व्यवस्थापन आध्यात्मिक होते तेव्हा व्यक्तीची भूमिका योध्याची असते तर कुटुंब ,समाज ,देश इत्यादी समूहाच्या व्यवस्थापनाचे आध्यत्मिकीकरण होते तेंव्हा व्यक्तीची योजक भूमिका असते.

**योजक** :   बौद्धिक ज्ञानामुळे एखाद्या चांगल्या कार्याची दृष्टी मिळते. पण त्या ज्ञानाला कार्यकौशल्य साधून आध्यात्मिक गती दिली तरच ज्ञानाचे सोने होते. संसाधन असूनही त्याची ओळख नसेल,त्याचा उपयोग करण्याचे ज्ञान नसेल तर असे संसाधन सोन्याच्या खाणीतील दगडच ठरेल.भगवद्‌गीतेतील ज्ञान व्यक्तिमत्त्व विकास,समाजव्यवस्थेचे पुनर्निर्माण यासाठी उपयोगात आणले तर  वर्तमानातील अंधार दूर करण्यासाठी प्रकाश ठरते.

समाजात सामाजिक व व्यक्तिगत अशा दोन प्रकारचे  प्रश्न असतात.भगवद्‌गीतेतील धर्मस्थापना आध्यात्मिक क्रांतीचा संदेश देते.धर्मग्लानीतील बाह्यविघ्न(शोषण) व आंतर्विघ्न(जीवनातील संभ्रम) अनुक्रमे सामाजिक व व्यक्तिगत  प्रश्नाचे निदान करते. प्रश्नाचे निदान झाले तर लक्ष(Goal)ठरविता येते.लक्ष साध्य करण्यासाठीच व्यवस्थापन असते.प्रश्नाचे निदान करणे ही वैज्ञानिक दृष्टी असते,व्यवस्थापनाची सिध्दता करणे ही योजक भूमिका असते.

मानवजीवनाचे वाचन  करूनच  जगात ज्ञान उपलब्ध झाले. मनुष्याला त्याच्या जीवनाचे पुस्तक वाचता आले तर उपलब्ध ज्ञान उपयोगात येते. प्रश्नाचे निदान करणे ही  वैज्ञानिक दृष्टी असते.यामुळे साध्य(ध्येय) ठरविता येते. ध्येय साध्य करण्यासाठी व्यवस्थापन(योजक-The Orgonizer)  दृष्टी असते. ज्ञानी दृष्टीमुळे प्रश्नाचे निदान होते. प्रश्नाचे निदान झाले तर कोणताही  प्रश्न हसत खेळत, समुह निष्ठेने (Team Spirit)सोडविला तर तो प्रश्न सहज सूटतो.

जीवनाच्या विकास दृष्टीमुळे व्यक्तीमत्व  विकास होतो व समूह निष्ठा(Team Spirit) धारण होते. समूहात सर्वांचे हीत साध्य व्हावे ,कार्यक्षमतेला वाव मिळावा म्हणून जे कार्य समूहाच्या समृदीसाठी योग्य आहे त्याच कार्याद्वारे व्यक्तीच्या गरजपूर्ती होणे व सृष्टीला साहायभूत ठरेल अर्थात **जगत हिताय** ठरेल असे कौशल्य व्यवस्थेत साध्य होते ते समाजव्यवस्थेचे आध्यात्मिक व्यवस्थापन ठरते.

व्यक्तिगत समृध्दीचा मार्ग योग्य करण्यासाठी अमृतधर्म व समाजव्यवस्थेला योग्य दिशा देण्यासाठी विश्वधर्म  एकाच नाण्याच्या दोन बाजू ठरतात हेच नाते **आत्मनो मोक्षार्थ जगतहितायच** ही संकल्पना साकार करू शकते. भारतातील महामानवांनी परिवर्तन घडवून आणण्यासाठी याच तत्त्वाचा स्वीकार केलेला आढळतो.म्हणून त्यांच्या जनजागृतीचा उद्‌देश समाजात आध्यात्मिक क्रांती  घडून येणे हाच होता. सृष्टीच्या संचलनचक्राला  सहकार्य करणारी शाश्वत समाजव्यवस्था धारणेची  दृष्टी आध्यात्मिक क्रांतीमुळेच मिळते. **आत्मनो मोक्षार्थ जगतहितायच** हाच आध्यात्मिक क्रांतीचा संदेश  ठरतो.विकासचक्र प्रवर्तन  **'आत्मनो मोक्षार्थ जगतहितायच'**चा संदेश ठरतो.

## १.२.) **आत्मनो मोक्षार्थ जगत हिताय च** या संदेशाची वैज्ञानिक दृष्टी

***Neither the life of an individual nor the history of a society can be understood without understanding both.- C.Wright Mills***

प्रत्येक राष्ट्राची स्वतंत्र ओळख त्याच्या संस्कृतीमध्ये दडलेली असते .सांस्कृतिक व्यवस्था वर्तमानाचे आव्हान स्वीकारण्यासाठी समाज व्यवस्थेची शक्ती होणे आवश्यक असते .अध्यात्मज्ञानाचा पुरातन वारसाच भारताला लाभलेला आहे .भारताला लाभलेली समृद्ध आध्यात्मिक परंपरा भारतीयांचे शक्तीस्थान आहे.प्राप्त काळाचे आव्हान स्वीकारण्यास समर्थ होण्यासाठी याच शक्तीचा उपयोग करण्याचे स्वामी विवेकानंदानी आव्हान केले.

**आत्मनो मोक्षार्थ जगत हिताय च** यांतील शब्दांचा संदेश स्वतःचे स्वातंत्र्य व जगतहित असा सरळ संदेश जातो.ही प्रक्रिया साध्य करण्यासाठी आध्यात्मिक क्रांतीची संकल्पना स्पष्ठ केलेली आहे. प्रत्येक मनुष्यात ईश्वर या वैश्वीक(Universal) शक्तीचा वास सारख्याच प्रमाणात वसलेला आहे.वैयक्तीक मनाला(Human mind) वैश्वीक मनाशी(Universal mind) जोडण्यासाठी ज्ञान म्हणून अध्यात्मज्ञानाचे प्रयोजन आहे.अध्यात्मज्ञानाचा वापर करून मनुष्याला त्याचे जीवन सुखी करता येईल व ही भूमिका पार पाडतांना राष्ट्र समृध्दी ,जगत हीत यासाठी त्याची भूमिका सहाय्यभूत ठरेल .या प्रक्रियेलाच मनुष्य जीवनातील आध्यात्मिक क्रांती संबोधले आहे.

**विश्वधर्म : सर्वधर्मान परित्यज्य मामेकं शरणं व्रज** (गीता १८–६६) हा भगवतगीतेतील शाश्वत विश्वधर्माचा संदेश आहे.धर्म मनुष्य जीवनाची सामान्य/ प्राकृतिक पातळी व ज्ञानी याला जोडणारा दुवा असते.धर्मातील दृष्टी स्वर्गवादी अर्थात प्राप्तीवादी दृष्टी असते याच दृष्टीतून ईश्वर श्रध्दा असते अर्थात याच दृष्टीतून ईश्वर ओळखतो.म्हणून धर्माला मर्यादा येते.परंतु यातून ईश्वर श्रद्धा असते.ही ईश्वर श्रद्धा ईश्वरज्ञानाचे साधन ठरते. सृष्टीचा अध्यक्ष या भूमिकेत ईश्वर जगाचे (संचलन)नियोजन करतो या अर्थाने ईश्वरज्ञान झाले तर ईश्वराने केलेले सृष्टीचे नियोजन व मनुष्याच्या जीवनाचे प्रयोजन हाच आध्यात्मिक व्यवस्थापनाचा आधार ठरतो.

**अध्यात्मज्ञान – ज्ञानसंच्छिन्न संशयम्.** (गीता ४–४१)

भगवतगीतेतील ईश्वराची संकल्पना जीवनातील ज्ञानाची आहे.ईश्वराचा आश्रय ज्ञानाचा आश्रय ठरतो.हाच बुद्धियोग ठरतो.सूर्य सृष्टीला प्रकाशीत करतो,अंधाराचा नाश होतो.संशय व विश्वास,अंधार व प्रकाश यातील भेद अज्ञान व ज्ञान असतो.सूर्य व सृष्टी यांचे नाते प्रकाशाचे असते,तसेच मानवजीवन व त्याचे नित्य स्वरूप आत्मा यांचे नाते ज्ञानाचे असते

**जन्मकर्म च मे दिव्यं एवं यो वेत्ती तत्वतः** (गीता ४–९)

अर्थात लोककल्याणासाठी चांगले कार्य ईश्वरकार्य जाणले तर ईश्वरज्ञानाची ओळख होते.प्रकृती सत,रज व तम गुणाने व्याप्त आहे हे मान्य केले तर सत (चांगले) होणे याचा हेतूशाश्वत तत्वाशी जोडणे असते.जीवनाला ईश्वरज्ञानाशी जोड्ले तर स्वतःच्या जीवनाचे प्रयोजन ईश्वराने केलेले आहे.हा बुद्धियोग प्राप्त होतो.प्रत्यक्ष विश्वरूप पाहण्यासाठी अर्जुनाला दृष्टी दिली त्याला दिव्य दृष्टी म्हटले,व ईश्वरज्ञान जाणण्यासाठी ज्ञानी दृष्टी लाभावी यासाठी बुद्धियोग(Connection of Human mind with cosmic mind)म्हटले.

विज्ञानाने जग बदलते,तर अध्यात्माने मनुष्य स्वतःला बदलतो.मनुष्याचा जीवनप्रवास सक्षम व सुखी होण्यासाठी अध्यात्माची भूमिका जाणली तर आध्यात्मिक क्रांतीची उपयुक्तता कळते.हीच आध्यात्मिक क्रांती समाजव्यवस्थेला योग्य दिशा देण्यास साहायभूत ठरते व जागतिक शांती प्रस्थापित होण्यास महत्वपूर्ण भूमिका बजावु शकते.सृष्टीचे संचलनचक्र सृष्टीचे नैसर्गिक व्यवस्थापन असते.सृष्टीच्या संचलनात ज्ञानविज्ञान आहे हे जाणले तर ईश्वरज्ञान ज्ञानविज्ञानाचा स्त्रोत ठरतो. याप्रमाणे विज्ञान व अध्यात्म याच्या समन्वयाने मनुष्यजगाच्या भौतिक समृद्धीत स्वतःची भूमिका सक्षम करून व विज्ञानाच्या प्रगतीला योग्य दिशा देऊन **आत्मनो मोक्षार्थ जगत हिताय च** ही संकल्पना साकार करू शकतो .अमृत धर्म वा विश्वधर्म यांची हीच संकल्पना आहे .

,

## २) परिवर्तन

**यदा यदा हि धर्मस्य ग्लानिर्भवति भारत**

जग सुंदर आहे व या सुंदर जगात मनुष्याचे जीवन सर्वात सुंदर असते हा शाश्वत धर्माचा मनुष्याला संदेश आहे.मनुष्याच्या जगण्यातील शोषणरूपी बाह्ययविघ्न , द्वंद्वरूपी आंतर्विघ्न दूर व्हावे व प्राप्त परिस्थितीत काळाचे आव्हान स्वीकारता यावे म्हणून ज्ञानाची अर्थात योग्य मार्गाची गरज असते.

समाजातील संभ्रमाला भगवद्गीतेत धर्मग्लानी संबोधले आहे .धर्मग्लानीतून मुक्तीसाठी ईश्वरज्ञानाची ओळख दिली व शाश्वत अमृत धर्म सांगितला. धर्मग्लानीचे आंतर्विघ्न व बाह्ययविघ्न हे दोन पैलू असतात. जग सुंदर आहे. हा बाह्यविघ्नमुक्ती साठी आधार असतो तर स्वतःचा आदर करणे व स्वतःचा मित्र होणे हा आंतर्विघ्न मुक्तीचा आधार असतो. म्हणून शाश्वत धर्माचा उपयोग व्यावहारिक पारदर्शकता आणण्यासाठी होतो. या पारदर्शकितेमुळेच जीवनमार्गातील परिवर्तन व समाजव्यवस्थेतील परिवर्तन करणे शक्य होते. म्हणून आध्यात्मिक क्रांतीसाठी भगवद्गीतेतील शाश्वत धर्म उपयुक्त ठरतो.समुहाचे व्यवस्थापनातील नियतकार्य स्वधर्म **(Tiebreaker) ठरवीत असतो.**

**धर्मग्लानि** : जगात जेंव्हा जेंव्हा क्रांती झाली तेंव्हा विचारबदल झाला. बुध्दीला नवदृष्टी दिली.ज्या धर्मामुळे कोण चूक कोण बरोबर हा संभ्रम झाला व प्रत्यक्षात ज्यामुळे लोकांचे आर्थिक शोषण व्हायचे .त्या

धर्मालाच दूर करण्यासाठी मार्क्सची आर्थिक किंवा व्यावहारिक क्रांती ठरली . धर्म ,राजकीय क्षेत्र समुहहितासाठी असते.या क्षेत्राचा व्यापार होणे,चांगले चालत नाही असे संदेश समाजात जाणे हे धर्मग्लानीचे लक्षण असते.यामुळे सामाजिक मानसिकताच प्रदूषीत होते.सामाजिक,व्यक्तिगत मानसिकतेत बदल हाच धर्मस्थापनेचा विषय बनतो. इतरांनी काय करावे हा बाह्यविघ्नातील प्रश्न असतो,तर स्वतः काय करावे हा आंतर्विघ्नातील प्रश्न असतो.समाजातील शोषण वर्तमानातील सामाजिक आव्हान *(Reformation of society)*असते व जीवन मार्गातील संभ्रम मनुष्याचे वर्तमानातील आव्हान *(Transformation of attitude)*असते.वर्तमानातील अज्ञानाचे निदान होते.अर्जुनाला संभ्रम झाल्यामुळे आपलीच बाजू चुक आहे हे मान्य करून स्वतःच बाजूला झाला. श्रीकृष्णाने याच भ्रमाला धर्मग्लानी म्हटले. **यदा यदा हि धर्मस्य ग्लानिर्भवति भारत** (४–७) याद्वारे धर्मग्लानी व्यक्त करून आध्यात्मिक क्रांतीचा उद्देश्य स्पष्ट केला .

भगवतगीतेनुसार समाजातील शोषण बाह्यविघ्न हा सामाजिक प्रश्न व मनुष्याचा संभ्रम (*Tie*)आंतर्विघ्न हा मानसिक (व्यक्तिगत)प्रश्न ही स्थिती धर्मग्लानी असते. धर्म जीवनातील तसेच समाजातील दुर्बलता ठरू नये,तर शक्ती व्हावी.धर्म जीवनात संभ्रम निर्माण करण्यासाठी नसून जीवनातील संभ्रम दूर करण्यासाठी आहे.धर्म शोषण करण्यासाठी नसून समाजातील शोषण दूर करण्यासाठी आहे.सामाजिक व्यवस्था निरोगी असो वा नसो ,मनुष्याला स्वत:चा मार्ग चालावाच लागतो.स्वत:ला कार्यरत करावे लागते.व्यवस्था(***system***) निरोगी नसेल तर याच कार्यातून धर्मस्थापनेचे (***Reformation of system***) कार्य होत असते.

## २.१) समाजव्यवस्थेचे संचलन (विकास) :

*गोष्ट – एका राज्यात फुगे बनविणारा कारागीर राजाकडे आला व आपल्या राज्यात जागा द्या म्हणून विनंती केली. त्याला राज्यात सामावून घेण्यासाठी राजाने युक्ती केली.फुगे एकादशी सुरू केली. या दिवशी लोकांनी उपवास करायचा व फुगे खेळायचे .कारागीराच्या उदरनिर्वाहाची व्यवस्था झाली. लोकाची एक दिवसाची अन्नावरील खर्चाची बचत झाली.तीच बचत फुगे खरेदीसाठी वापरली.यामुळे अतिरिक्त भार लोकांवर आला नाही.*

समाजव्यवस्थेत सर्वांना रोजगार मिळेल हे समाजव्यवस्थेचे दायित्व असते.म्हणून प्राप्त काळात रोजगार निर्मितीस सक्षम असणारी व संस्कारीत समाजव्यवस्था निर्माण होणे हेच समाजाच्या, देशाच्या विकासाचे लक्ष असावे.मनुष्याच्या गुणात्मक विकासासाठी स्वतःला कार्यसंधी मिळवून देणे व कार्यरत होणे हा सर्वसामान्यांचा मुख्य प्रश्न असतो. कार्याद्वाराच स्वतः स्वावलंबीत होत असतो अर्थात स्वतःचा योगक्षेम चालविण्यास समर्थ होतो. म्हणून समाजव्यवस्थेची योग्य वाटचाल व्हावी, यासाठी समाज, देश यांच्या

समृध्दीचे उपाय मनुष्याच्या कार्यक्षमतेला वाव देणारे असावेत. जर हे साध्य होत नसेल तर मनुष्याचा मुख्य प्रश्न व समृध्दीचे उपाय यात तफावत निर्माण होते.

**स्वप्नरंजन**:

**अ)** *गोष्ट – एक साधू राजाकडे येतो. साधूला राजाने राज्याचे भ्रमण करविले. आपण धर्मशाळा, देवळे, बगीचे इ. बांधून धर्माचे कार्य केले हे दर्शविले.साधूच्या दृष्टीक्षेपात गरिब वस्ती आली. तेव्हा साधूने विचारले लोकांची अशी अवस्था कां झाली, की ते धड जगूही शकत नाही. तेव्हा राजा म्हणतो हे त्यांचे नशीब आहे. पूर्वजन्माच्या पापानुसार त्यांना ही अवस्था प्राप्त झाली. यशाचे दायित्व राजा आपल्याकडे घेतो पण अपयशाचे खापर धर्मावर फोडतो.*

प्राचीन व्यवस्थेत व्यवसायाचे दायित्व धर्माकडे जात होते तर अर्वाचीन काळात अर्थात विज्ञान युगात हे दायित्व समाजव्यवस्थेचे ठरते.विज्ञान आणि धर्म, व्यवहार आणि आदर्श यांत गोंधळ निर्माण झाला तर सामान्य लोकांचा भ्रम होतो. प्रश्नाचे निदान करून त्याचे उत्तर शोधण्याऐवजी त्या प्रश्नाचीच राजनिती व धर्मनिती होऊन प्रश्न तसाच कायम राहतो. यामुळे त्यांचा जीवन प्रवास संभ्रमातच सुरू असतो. मानवाचे शोषण करणाऱ्या संभ्रम करणाऱ्या धर्मातील कालबाह्य सृति अंधश्रद्धा म्हणून ठरविली जाते. म्हणून धर्मालाही नविन आयाम दिल्या जातो.मार्क्सकालीन समाजात धर्माचा समाजव्यवस्थेवर पगडा होता. व्यवस्थेला नविन आयाम मिळावा म्हणून मार्क्सने धर्मालाच दूर लोटले.

**ब)** आर्थिक विकास दर वाढणे हे विकासाचे परिमाण असते तेव्हा झीरप पध्दतीचा व नीतीचा वापर होत असतो.जेव्हा विकासाचे संदर्भात अर्थतज्ञ, राजकीय तज्ञ समाज समृध्दीचे स्वप्न वरून रंगवतात. तेव्हा समृध्दीचे बाबत तज्ञांचे ज्ञान सामान्यासाठी स्वप्नरंजन ठरते. या संदर्भात ई.एफ. शुमाखरने **गूडवर्क** द्वारा एक गोष्ट नमूद केली.

*गोष्ट – एका अर्थतज्ञाला एक व्यक्ती भेटतो व आपण देव आहोत असे तो सांगतो. तेव्हा अर्थतज्ञ म्हणतो, देवा, तुमचा एक सेकंद म्हणजे हजारो वर्ष, तुमचा एक पैसा म्हणजे करोडो रूपये असे आम्ही ऐकले आहे. देव म्हणतो, तू बरोबर ऐकलेस. तेव्हा अर्थतज्ञ म्हणतो, देवा एक पैसा देता कां? तेव्हा देव म्हणतो, अवश्य देईल परंतु बेटा, एक सेकंद थांब. अर्थात हा माणूस हजारो वर्ष थांबला तर करोडो रुपये मिळून तो श्रीमंत होईल.*

या दोन्ही गोष्टीचे तात्पर्यच असे की, स्वप्नरंजन मनुष्याला भ्रमात ठेवते.पहिले उदाहरण विकासातील त्रुटी साठी धर्माचा दाखला देते तर दुसरे विज्ञानातील त्रुटी दर्शवते.डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांनी म्हटल्या प्रमाणे विज्ञानाच्या आधाराशिवाय धर्मशास्त्रे , समाजशास्त्रे पांगळी ठरतील.तर समाजशास्त्राच्या सामाजिक बांधीलकीशिवाय विज्ञान आंधळे ठरेल.समाजव्यवस्थेचा प्रवाह योग्य दिशेने वळविण्यासाठी सामाजिक इच्छाशक्ती निर्माण व्हावी म्हणून समाजव्यवस्थेच्या जडणघडणीत धर्म व विज्ञान यांची भूमिका व मर्यादा जाणून घेणे आवश्यक असते.

## २.२) समाजधारणेत धर्माची भूमिका व आव्हान :

मानव जन्माला कार्य करणे हे साधन विकासासाठी मिळाले आहे. या जगात जगण्याचे आव्हान स्वीकारण्यासाठी कार्याला मूल्यांची जोड देणे आवश्यक असते. स्वतःला निर्णय अधिकार मिळवून देण्यासाठी स्वावलंबीत होणे याद्वारे कार्याचे महत्त्व स्वतःला पटते. स्वावलंबीत होणे हे पायाभूत स्वातंत्र्य मुल्य आहे. ज्यामुळे मनुष्य खऱ्या अर्थाने स्वतंत्र असतो. मनुष्य एकाच वेळी कुटुंब, समाज, देश, निसर्ग या वेगवेगळ्या मंचावर जगत असतो. प्रत्येक मंचाचा (वर्तुळात) स्वतःचा धर्म असतो व या सर्व धर्मांना मनुष्य स्वतःच्या स्वधर्मानेच जोडू शकतो. कार्याला स्वधर्म करणे म्हणजे उच्चमूल्यांची जोड देणे. यामुळे कार्यातील संशय मिटून दृढनिश्चयी होतो व कार्यातून
शक्तीची, दिव्यत्वाची अनुभूती होते. म्हणून ज्ञान संस्कारात कार्यकौशल्य साधण्यासाठी कार्याला स्वधर्म करणे हा महत्त्वाचा संस्कार आहे. सुसंस्कृत व्यक्ती आपापल्या निष्ठेप्रमाणे स्वतःला स्वधर्म देतो.
(अ) समाजातील कायद्याचे पालन करणे, मानवी मूल्यांचे पालन करणे. नीती मुल्यांचे पालन करणे या हेतूने कर्तव्य वा स्वधर्म देणारे
(ब) आपापल्या धर्मातील नीतीप्रमाणे स्वधर्म देणारे.
(क) जीवनमार्ग दृढ होणे म्हणजे स्वतःला द्वंदमुक्त करणे.आत्मनिष्ठ होऊन दृढव्रती होण्यासाठी ईश्वरज्ञानाने संशय दूर करून, स्वतःला स्वधर्म देणे. यात स्वधर्माची निष्ठा अनुक्रमे सुसंस्कृत, धार्मिक किंवा आध्यात्मिक असते. याप्रमाणे कार्याला स्वधर्म करून कार्यकौशल्य साध्य करणे हा संस्कार असतो. स्वधर्मामुळे समर्पित वृत्तीने कार्य घडते अर्थात (ईश्वरज्ञान अनुभूतीसाठी) भक्ती घडते.

### धर्माचा आश्रय :

इश्राइलमधील धर्मसंस्थापक मोझेसने यहूदी लोकांना इजिप्त येथील राजाच्या जाचातून मुक्त करून स्वातंत्र्य मिळवून दिले. परंतु समाजात स्वैरता आढळली व्यवस्था लोप पावली तेंव्हा(जहोवा) ईश्वराकडून दहा आज्ञा मिळविल्या त्या आधारावर धर्माची स्थापना केली .व्यवस्थेविणा समाज स्वैर होतो. महामानव

व्यवस्थेतील दोष दूर करून समाजव्यवस्थेचा प्रवाह सुव्यवस्थीत करतो याप्रमाणे मोझेसने व्यवस्थेतील दोष दूर करण्यासाठी धर्माचा आश्रय केलेला आढळतो. याप्रमाणे धर्मसंस्थापकांनी व्यवस्था सुसंचालीत करण्यासाठीच धर्माचा आश्रय केलेला आढळतो.

### वर्णाश्रम व्यवस्था(**मानव संसाधन विभागव्यवस्था** ) :

विशिष्ट कार्याला योग्य स्वभाववृत्ती असले तरच कार्य सहजकार्य ठरते. मनुष्याचा गुणात्मक विकास व्हावा, म्हणून जे त्याच्या स्वभाववृत्तीला योग्य होईल व शरीरधर्मानुसार सहजकार्य वाटेल त्या कार्याला धर्मविधान करून स्वतःची आध्यात्मिक उन्नती करावी म्हणून प्राचीन भारतात कार्याचे वाटप करणारी समाजव्यवस्था अस्तित्वात होती. जी वर्णाश्रम धर्म या नांवांने प्रचलित होती.

प्रकृती सत (प्रकाश–ज्ञान), रज (प्रवृत्ती –कार्य )व तम (मोह–अज्ञान)या तीन गुणाने युक्त आहे ,हा भगवतगीतेतील विज्ञानाचा आधार आहे.ईश्वरज्ञान गुणातीत असते व ज्ञान–विज्ञान याचा समन्वय साधते.सत्गुण सुख व ज्ञान यांचा समन्वय साधते.सुसंस्कृत अवस्था हा सत्गुणांचा प्रभाव, पुरुषार्थ अवस्था हा रजगुणांचा प्रभाव तर परावलंबी अवस्था हा तमगुणांचा प्रभाव असतो. गुणानुसार कार्याची विभागणी झाली. म्हणून तत्कालिन समाजव्यवस्थेला अध्यात्मज्ञानाची जोड दिली, तो वर्णाश्रम धर्म ठरला.स्वधर्माला धार्मिक संदर्भ प्राप्त झाला .आपापल्या कार्याद्वारे जर व्यक्ती स्वधर्म आचरण्यात सिध्द झाला तर तो सत्गुणाने प्रभावीत होईल व निष्क्रीयतेला कारण तमगुण व लोभ याला कारण रजगुण या दोन्ही गुणावर मात करता येईल.यामुळे कार्याचा अधिकार धर्मविधान झाले होते. कार्य अधिकार धर्माचे दायित्व बनले होते.

ज्याप्रमाणे इंग्लंडमध्ये राजघराण्यातील व्यक्तीच राजा होईल हे धर्मविधान होते. यामुळे नेपोलियन बोनापार्टला राजा म्हणून इंग्लंडने संबोधले नाही. कारण त्याचा जन्म राजघराण्यात झालेला नव्हता. याप्रमाणेच प्राचीन भारतात कार्य अधिकार धर्मविधानच (**Constitutional Right of work abide by law of religion**) बनले. जातीनुसार कार्य अधिकार होते. कारागीरांची संपूर्ण फळी उत्पादन (तत्कालिन औद्योगिक कार्य) कार्यात गुंतलेली होती. भारतात ज्ञान विज्ञान संस्कृत भाषेत उपलब्ध होते व जातीनुसार व्यवसाय स्वीकारण्याची प्रचलित पध्दत होती. यामुळे ज्ञान विज्ञानाचा प्रत्यक्ष कार्यासाठी उपयोग होण्यास मर्यादा आली.

## २.३)समाजव्यवस्थेचे परिवर्तन व योगदान :

***All that is valuable in human society depends upon the opportunity for developement accorded the individual.- Albert Einstein***

अ) **धर्म व समाजव्यवस्था :**

समाजव्यवस्थेतील व्यक्तीचे कार्याचा स्वधर्म (संस्कृति अर्थाने) व धर्म यांत योग्य समन्वय असला तर मनुष्याचा स्वधर्म (व्यावसायिक धर्म) हा त्याचे आध्यात्मिक उन्नतीस अनुकूल होतो. असा धर्म समाजात शांती, सुख, समृध्दी येण्यासाठी महत्त्वाची भूमिका बजावेल. परंतु व्यावसायिक हितसंबंध साध्य होण्यासाठी किंवा आपल्या कृतीचे, निष्क्रीयतेचे समर्थन करण्यासाठी धर्माचा वापर होतो तेव्हा धर्माचा आदर्शच खाली खेचल्या जातो व धर्म,आदर्शावरून समाजाचा विश्वास उडतो किंवा संभ्रम होतो. जेव्हा समाजात अशांती येते तेव्हा धर्माचेच आदर्श खाली खेचल्या जातात. स्वतःच्या निष्क्रीयतेचे समर्थन करण्यासाठी किंवा आपला कार्यभाग साधण्यासाठी धर्मसृतिचा वापर करतो. मनुष्याच्या मनात धर्म–अधर्म असा संघर्ष उभा होतो. ही अशांती दूर करण्यासाठी नवीन नियमांची गरज असते. जुन्या प्रस्थापित नियमांचा व त्याद्वारा सृतिंचा इतका जबरदस्त प्रभाव असतो की ते नियम तोडणे पाप वाटते, अधर्म वाटतो. त्याला स्वधर्माचाच संभ्रम होतो. हा संभ्रम दूर होण्यासाठी धर्मालाच आव्हान असते. अशावेळी नवीन नियम बनवून महामानव मार्ग दाखवतात. जो संपूर्ण समाजाला नवीन मार्गावर आणतो अशा महामानवांनी वेळोवेळी या भूतलावर जन्म घेतले व समाजाला नवीन दृष्टी दिली.

जागतिक परिवर्तनात विज्ञानाचे स्थान अभेद्य आहे,हे कुणीही अमान्य करणार नाही, शिक्षण व आधुनिक उद्योग प्रधान अर्थव्यवस्था यामुळे समाजव्यवस्थेचा प्रवाह बदलत असतो. समृध्दीच्या वाटचालीत परिवर्तीत समाजव्यवस्थेतील दोष शोषणांचे कारण ठरते. शोषण करणाऱ्या समाजव्यवस्थेवर धर्माचे शिक्कामोर्तब झाले म्हणून कार्लमार्क्सने धर्माला अफुची गोळी संबोधून समाजव्यवस्थेपासून वेगळे केले.यामुळे समाजव्यवस्थेच्या धारणेत समाजव्यवस्था व धर्म स्वतंत्रपणे भूमिका बजावतात हे सिध्द झाले.

### ब) व्यावहारिक पारदर्शकता :

जेव्हा व्यवहार व आदर्श यात गोंधळ निर्माण होतो तेव्हा हा संभ्रम दूर होणे आवश्यक असते. **ब्रह्म सत्य जगत मिथ्या** या तत्वाला अनुसरून ब्रह्मवादी विरूद्ध इहवादी हा संभ्रम सोडवितांना संत बहिणाबाई म्हणतात. 'देवळाच्या कळसाला लोटा म्हणून नको व संसाराला खोटा म्हणू नको ,आधी हाताले चटके मग मिळते भाकर अरे संसार, संसार' याप्रमाणे संसाराची अर्थात इहवादाची व्याख्या करून बहिणाबाई सामान्याचा भ्रम दूर करते. इहवादी असले तरी समाजव्यवस्थेत दोष निर्माण झाला तर शोषण होते व त्या शोषणाची राजनीतीही होते व धर्मनीतीही होते. शोषणाधिष्ठित समाज व्यवस्थेवर धर्माचे शिक्कामोर्तब झाले की, धर्म बदनाम होतो. यामुळेच मार्क्सला धर्म अफुची गोळी आहे असे म्हणावे लागले.

### धर्म व समाजव्यवस्थेचे वेगळेपण :

व्यक्ती आणि समाज समृद्धीसाठी धर्म व्यक्तीला भ्रमात टाकणारा नसावा तर भ्रमातून मुक्त करणारा असावा. म्हणून आदर्शवादालाही वैज्ञानिक दृष्टी देवून व्यावहारिक पारदर्शकता आणणे आवश्यक असते. व्यावहारिक संदर्भात निर्णय अधिकार, कर्तव्य, कार्यक्षमता या शब्दांना महत्व असते .शाश्वत जीवनमूल्ये व्यावहारिक मार्ग सक्षम होतो. तर सेवा, त्याग, उपकार या आदर्शमूल्याचा संदेश देण्यासाठी धर्मसृतिचा वापर होतो. व्यवहाराला आदर्शाचा साज चढविल्यामुळेच व्यावहारिक शहाणपण सौम्य होते. यामुळे अधिकार कर्तव्य कार्यक्षमता याचे नीट आकलन होत नाही. व भ्रम निर्माण होतो. मार्क्सने शोषणाचे वैज्ञानिक कारण शोधले धर्माने प्रमाणित केलेल्या शोषणाधिष्ठित समाजव्यवस्थेत अधिक मोबदल्याचा अधिकार असूनही श्रमिकांना याचकाची भुमिका स्वीकारावी लागत आहे. या स्थितीला कारण धर्म उपकार व अधिकार यात भ्रम निर्माण करून व्यक्तीला अधिकारापासून वंचीत करीत आहे. म्हणून धर्म व समाजव्यवस्था वेगवेगळे केले समाज विज्ञानाच्या उत्क्रांतीच्या इतिहासातील हा महत्वाचा शोध ठरला.

समाजातील सर्व लोकांना व्यवसाय संधी उपलब्ध व्हावी व सुसंस्कृत समाज निर्माण व्हावा यासाठी समाजव्यवस्थेला नित्य नवीन आयाम मिळणे अपरिहार्य असते.कोणत्याही समाजाच्या उन्नतीसाठी योग्य समाजव्यवस्थाच कारणीभूत ठरते. राष्ट्र किंवा समाज गरीब रहात असेल तर तो दोष समाजव्यवस्थेचा असतो. जेव्हा समाजात बेरोजगारी,शोषण,दडपशाही,हिंसाचार डोके वर काढतो तेव्हा समाजव्यवस्थेत दोष निर्माण झाला याचे ते निदर्शक असते.समाजातील भ्रष्टाचार हे स्वार्थी मूल्यांची प्रबळता व नैतिक मूल्यांची घसरण दर्शविते. बेरोजगारी, शोषण हा व्यवस्थेतील दोष असतो. म्हणून शोषण दुर होण्यासाठी व समाजव्यवस्थेला नवीन आयाम देण्यासाठी व्यवस्थेत निश्चितपणे सुधार करावी लागते. स्वातंत्र्यासाठी क्रांती, राजकीय क्रांती, धार्मिक क्रांती इत्यादी माध्यमातून हीच प्रक्रिया समाजात नित्य सुरू असतांना दिसते.

### क)समाजधारणेत आध्यात्मिक क्रांतीची संकल्पना :

रॉबर्ट ग्रीन इंगरसॉलने धर्माच्या गुलामीला विरोध दर्शविला आहे (**Religion can never reform mankinds because Religion is slavary** असे इंगरसॉल म्हणतो .)पण तोच म्हणतो, **What light is to the eyes, Liberty is to the Soul of man** डोळे व प्रकाश यात जे नाते असते,तेच नाते आत्मा व स्वातंत्र्य यात असते.यातच भगवद्गीतेतील मोक्ष(**Liberty**) या शब्दाचे रहस्य दडलेले आहे. अध्यात्मज्ञान ऐहिक विकासाला बाधक आहे. हा गैरसमज दूर करण्यासाठीच भगवद्गीतेची उत्पत्ती झाली.

विज्ञानाने जग बदलविले. समाजव्यवस्थेत स्थित्यंतरे घडून येतात. व्यवसायाला नवीन आयाम दिल्या जातो व व्यक्ति काळानुसार कार्य स्वीकारतो. विज्ञानाचा अंगिकार करून मनुष्याने निसर्गातील शक्तीचा शोध लावला व सत्याचा उलगडा झाला. मनुष्य प्रचंड कार्यक्षम व्हावा व समाजाचे उत्थान व्हावे याची उत्तरे मिळणे विज्ञानामुळे शक्य झाले. समाजातील मनुष्यबळ अडथळा नसून विकासाला पूरक आहे ही दृष्टी समाजात

प्रस्थापित होण्यासाठी समाजव्यवस्थेला योग्य वळण देणे हे विज्ञानाला आव्हान आहे.हेच आव्हान स्वीकारण्यासाठी आध्यात्मिक क्रांतीचे प्रयोजन उपयुक्त ठरते.

समाजाचा प्रवाह सुव्यवस्थित चालण्यासाठी समाजव्यवस्था कारण असते. समाजव्यवस्था सक्षम करण्यासाठी विज्ञान व जीवनमार्ग सक्षम करण्यासाठी शाश्वत जीवनमूल्ये याचे योगदान ठरते. मनुष्याचा जीवनमार्ग सुव्यवस्थित चालण्यासाठी शाश्वत धर्माची भुमिका भगवदगीतेतून स्पष्ट झाली.धर्माद्वारे कार्याचे महत्व कमी करणे हा बुद्धीभेद ठरतो. भगवद्गीतेतून जीवनमार्गातील कार्याचे महत्व जाणून जीवनमार्गातील दोष दूर करण्यासाठी ईश्वरज्ञानाचे महत्व स्पष्ट केले. मनुष्याला त्याच्या स्वभाव प्रकृतीला अनुकूल होईल असे कार्य आवडते व योग्य कार्याची निवड झाली, तर ते सहजकार्य होऊन आनंदाने व निष्ठेने कार्य करेल. व्यक्तीने स्वतःला व्यावसायिक कार्याद्वारा स्वधर्म देणे त्याचे दायित्व ठरते. व्यक्तिगत व्यावसायिक कार्याच्या स्वधर्माचे साधन जाणणे हे ज्ञान व्यावसायिक कार्याचे आध्यात्मिकीकरण करण्याची दृष्टी देते. याचमुळे समाजधारणेत कार्य सर्वात महत्वाची भुमिका बजावते .याप्रमाणे वर्तमानाचे आव्हान स्वीकारण्यासाठी आध्यात्मिक क्रांतीची संकल्पना स्पष्ट होते.

**समाजव्यवस्थेचे पुनर्निर्माण** :सृष्टीचे संचलन आध्यात्मिक व्यवस्थापन आहे हे रहस्य कळते.कार्यात व्यावसायिक कार्य व सत्कार्य (सेवा कार्य ) असे विभाग केले तर व्यावसायिक कार्यात विविध क्षेत्र व्यवस्थापन शास्त्राने काबीज केले आहे.

१'समाजव्यवस्थेच्या धारणेत शाश्वत समाजव्यवस्थेची दृष्टी मिळते. समाज व्यवस्थेला योग्य वळण देणे शक्य होते.

२.समूहाचे व्यवस्थापनात योजक भूमिकेचे महत्व कळते..

३..समाजातील विविध क्षेत्रातील(आर्थिक ,सामाजिक ,धार्मिक ) मतभेद समाजातील शांतता व सलोखा भंग करीत असते. समाजात शांती व सलोखा निर्माण करण्याचे शास्त्र(Conflict Resolving Mechanism.) इंग्लंड व अमेरिकेत उदयास आले.समाजातील विविध क्षेत्रातील मतभेद दूर करण्यासाठी निश्चित सकारात्मक दृष्टी असलेले तज्ञ समाजाची आवश्यकता बनली आहे. याची पूर्तता करणे शक्य होईल.

## ३) आध्यात्मिक व्यवस्थापन :

### ३.१ समाजव्यवस्थेचे आध्यात्मिक व्यवस्थापन :

सृष्टीचक्र कार्याद्वारेच प्रवर्तित होत राहते. म्हणून भगवतगीतेत कार्याद्वारा आत्मोन्नती व्हावी यासाठी कार्याच्या आध्यात्मिक व्यवस्थापनाची प्रक्रिया स्पष्ट केली. अध्यात्म व विज्ञान यांचा समन्वय साधून अहिंसक व शोषणमुक्त समाज व्यवस्थेची धारणा करणे अशक्य नाही. योग्य दृष्टी असलेला समाज वैज्ञानिक हेच आव्हान स्वीकारीत असतो. म्हणून संस्कारित समाजधारणेसाठी समाजव्यवस्थेचे आध्यात्मिक व्यवस्थापन आवश्यक आहे. महात्मा गांधीनी विज्ञानाचा अंगीकार करतांना अहिंसक समाजव्यवस्था निर्मितीसाठी आध्यात्मिक व्यवस्थापनाची गरज स्पष्ट केली. मनुष्याला योगक्षेमासाठी कार्य देणे व त्याच कार्याद्वारा गांव समृद्धी, समाजसमृद्धी, देश समृद्धीचे उद्दीष्ट साध्य होणे अशी सक्षम समाजव्यवस्था सृष्टीचक्र चालविण्यास सहयोग करणारी असेल तर तीच आध्यात्मिक वा शाश्वत समाजव्यवस्था ठरते.हीछ व्यवस्था समाजव्यवस्थेचे शाश्वत विकासचक्र ठरते.

## अ) समाजव्यवस्थेचे शाश्वत विकासचक्र

### समाजधारणेत विज्ञानाची भूमिका

**–संसाधनाचे संचलन कार्य :**

समाजामध्ये उत्पादनासंबंधी संसाधनांचे संचलन कार्य ज्या दिशेने घडते ती दिशा समाजव्यवस्था धारण होण्यास कारण ठरते. म्हणून समाजाचे किंवा देशाच्या समृध्दीचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी संसाधनाच्या संचलन कार्याची योग्य दिशा ठरविणे व संसाधनांचे योग्य व्यवस्थापन करणे आवश्यक असते.

समाजामध्ये उत्पादनासंबंधी संसाधन निर्मितीचे संचलन कार्य खालीलप्रमाणे असते.

(अ) **विज्ञान** – निसर्गातील सत्य जाणणे

(ब) **तंत्रज्ञान** – संपत्ती निर्मितीत उत्पादन साधनांची (– यंत्र इ. )उपलब्धी

(क) **उद्योजक** – किफायतशीर कार्य (Economically Viable)

(ड) **समाज विज्ञान** – साधनांचा योग्य समाजव्यवस्थेसाठी उपयोग

**समाजव्यवस्था**

| | (१) | (२) | (३) | (४) |
| --- | --- | --- | --- | --- |
| परिणाम | **परावलंबीत (शोषित) व्यवस्था** | **पुरुषार्थ व्यवस्था** | **समाजप्रधान व्यवस्था** | **आध्यात्मिक (शाश्वत) व्यवस्था** |
| आर्थिक | गरीबी बेराजगारी | संपत्तीचे केन्द्रीकरण | सर्वांना रोजगार देण्यासाठी संयत्रंणा | समृध्दी |
| गुणात्मक | (१)शोषण भ्रष्टाचार, हिंसाचार, | (२)स्पर्धा,उपभोक्तावाद भ्रष्टाचार | (३)सुसंस्कृत समाजमनस्क | (४),सुसंस्कृत, मानवी मूल्यांचे दर्शन (अहिंसा) |

**–समाजव्यवस्थेच्या अवस्था**

मनुष्याला त्याच्या योगक्षेमासाठी जे कार्य लाभले असते त्याच कार्याद्वारे समाजाची उद्दिष्टे साध्य होणे व निसर्गाचे चक्राला त्या कार्याद्वारे सहकार्य होणे असे कार्य सत्कार्य ठरते व अशा कार्याची ज्या समाजव्यवस्थेत संधी उपलब्ध असते ती शाश्वत समाजव्यवस्था ठरते. स्वतःला स्वधर्म देणे हे मनुष्याचे व्यक्तिगत दायीत्व असते. ज्यामुळे कार्य स्वधर्माचे साधन ठरते. तर समाजातील व्यक्तींना सक्षम कार्य उपलब्ध होण्यासाठी प्रोत्साहन देणारी व्यवस्था निर्माण होणे हे सामाजिक दायित्व असते.समाजव्यवस्था जशी असेल त्याचा परिणाम समाजातील लोकांच्या वागणुकीवर दिसतो. चार प्रकारच्या समाजव्यवस्था निसर्गात दिसतात.

१. **रानटी समाजव्यवस्था (Economy of Parasite & Predators)** : ही परोपजीवी किंवा आक्रमक व्यवस्था ठरते. वाघ, बकरी वा इतर प्राण्यांवर आपली उपजीविका चालवितो. माकड इतरांनी तयार केलेल्या फळावर उपजीविका चालवितो. कोणत्याही कार्याचे दायित्व न स्वीकारता आपल्या फायद्यासाठी इतरांना प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष नुकसान पोहोचविण्याची प्रवृत्ती असते. जसे भ्रष्टाचारी व्यक्ती

स्वतःच्या फायद्यासाठी समाजाला नुकसानच पोहोचवतो. डाकू, खिसेकापू प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष इतरांना नुकसान पोहोचवतात.

२.**पुरूषार्थयुक्त वा व्यापारी समाजव्यवस्था** (**Economy of Enterprise**) : स्वतःच्या फायद्यासाठी कार्याचे दायित्व स्वीकारणे. परंतु समाजाच्या हितसंबंधाशी घेणे–देणे नसते. व्यक्तिगत फायद्यासाठी एखादा मोठा उद्योग निर्माण करतो. परंतु रोजगार उपलब्धी किंवा पर्यावरण दुषीत होणे इकडे दूर्लक्ष झाले तर, रोजगारीला ही व्यवस्था चालना देत नाही. व्यक्तिगत स्वार्थ हे या व्यवस्थेचे लक्षण असते. या व्यवस्थेत उत्पादन साधनांचे केन्द्रीकरण होते, म्हणून शोषण असते.

३.**सामाजिक अथवा समाजप्रधान समाजव्यवस्था** (**Economy of Gregation**) : समाजातील लोकांना रोजगार देणारी अर्थव्यवस्था. स्वतःचा फायदा समाजाच्या हीतसंबंधात विलीन करून समर्पित वृत्तीने कार्यरत होण्यास प्रोत्साहीत करते. या व्यवस्थेत कार्य उपलब्ध होते व स्वधर्माचरणास प्रोत्साहीत करते. या व्यवस्थेत उपभोक्तावाद वाढतो व जीवनाच्या राहणीमानाचे मूल्यमापन उपभोक्ता वस्तूवर असते. या व्यवस्थेत व्यक्ती समाजमनस्क व सुसंस्कृत असतात.परंतु सृष्टीचे हितसंबंधावर दुर्लक्ष होते.

४.**आध्यात्मिक वा शाश्वत समाजव्यवस्था** (**Economy of Permance**) : ही समाजप्रधान व्यवस्था असून सृष्टीचे संतुलन कायम राहण्यास सहकार्य करते. निसर्गाच्या नियमांचे पालन होऊनच सजीव प्राणी जिवंत असतो. सृष्टीतील प्रत्येक गोष्टीचा कुठे प्रारंभ होऊन नंतर कधीतरी अंत असतो. सृष्टीचक्र अव्याहत सुरू असते.सृष्टीचे कार्य जड (भौतिक)व चेतन(अधिभौतिक) यांच्या सहयोगाने सृष्टीचक्र चालविणे असते. सृष्टीत कोळसा, धातू, पेट्रोल हे सीमित स्वरूपात असल्यामुळे अशाश्वत संसाधन ठरते, तर लाकूड, नैसर्गिक वनस्पती पुनः पुनः निर्माण करता येतात. म्हणून शाश्वत संसाधन ठरतात. जे शाश्वत आहे, त्या सृष्टीचक्राला सहयोग करणारी समाजव्यवस्था स्थायी असते. ही व्यवस्था इतर देशांच्या शोषणावर उभी नसते. जीवनाचे मुल्यमापनात आध्यात्मिक (मानवी) मूल्य असते. जसे प्रामाणिकता, निर्भयता, पर कल्याण भाव, अहिंसा भाव इ. म्हणून साधन सूचितेला महत्त्व प्राप्त होते. याप्रमाणे समाजात नैतिक मूल्यांची स्थापना होण्यास योग्य समाजव्यवस्था धारण होते.

## ब) **दिशा – विकासदृष्टी** (**VISION**) :

Real management is developing people through work- -Agha Hasan Abedi

देशाची विकास दृष्टी जशी असेल तसा देश घडतो. देशाची विकास दृष्टी देशात जन आंदोलन निर्माण करीत असते.हे जन आंदोलनच ( विकास,राष्ट्रीयता,,देशभक्ती यांची )जन मानसिकता घडविते.संपत्तीच्या

निर्मितीत आणि समाजव्यवस्था घडवणुकीत समाजवैज्ञानिकाची भूमिका महत्त्वाची असते. आजच्या विज्ञानाने मनुष्याला बुद्धी प्रामाण्यवादी केले. विज्ञानाने वैज्ञानिक दृष्टी दिली. यामुळेच समाजासमोरील आव्हान स्वीकारण्यास योग्य दृष्टी मिळणे शक्य झाले. परंतु हे आव्हान न स्वीकारता प्रस्थापित चाकोरीबद्ध व्यवस्थेचे समर्थन करून पळवाटा शोधणे हे अज्ञान ठरते.चुकीच्या मार्गाने वाटचाल सुरू ठेऊन योग्य ठिकाण कधीही गाठता येणार नाही. एखाद्या देशातील औद्योगिकरणाची तंतोतंत अंधानुकरण करून समाजव्यवस्था घडणार नाही. अशा व्यवस्थेत दोष निर्माण होतात व ते दोष दूर करण्याचे आव्हान स्वीकारणे अपरिहार्य असते.

. **क) विकसित राष्ट्रांची विकासदृष्टी** :

अमेरिका, जापान या प्रगत राष्ट्रांनी आपल्या देशाला योग्य होईल असे औद्योगिकरण घडवून आणले इ.स. १९३० मध्ये अमेरिकन तंत्रज्ञानाची टीम सायट्रस फळांच्या प्रक्रीया करणारी यंत्रे पाहण्यासाठी इटलीत गेली. ती यंत्रे इटलीसाठी योग्य होती.अमेरिकेला मोठ्या प्रमाणावर उत्पादन करणारी यंत्रे हवी होती. त्याच तंत्रज्ञानाचा उपयोग त्यांनी मोठी यंत्रे बनविण्यासाठी केला. दुसरे सायट्रस फळांची नाशवंत व कमी दिवसाची उपलब्धी यामुळे सहकारी संस्था तोट्यात यायच्या म्हणून एक्सचेंज पध्दतीने व्यवस्थापन सुरू केले. सनकीस्ट एक्सचेंज ही संस्था कार्यान्वित झाली.

**मानव संसाधनाची विभागणी** (**H.R.D.VISION**):

वर्तमानात विकासाचे नियोजन करण्यासाठी मानव संसाधन विभागणी **१ कृषी क्षेत्र २ उद्योगक्षेत्र ३ इतर सेवाक्षेत्र** या तीन विभागात करण्यात येते. रोजगार निर्मिती, संसाधन विकास समृद्ध समाजव्यवस्थेची धारणा यासाठी उद्योजक क्षेत्र महत्वाची भूमिका बजावते.औद्योगिक नीती व शिक्षण प्रणाली वर्तमान व्यवस्था निर्माण करते. औद्योगिक विकासामुळे विकसित देशात कृषी क्षेत्रावरील भार कमी होत असतो. जपानने विकासासाठी याच तंत्राचा वापर केला. दुसऱ्या महायुध्दानंतर जपानमधील रोजगारीचा आलेख कृषी, उद्योग व सेवा क्षेत्रात अनुक्रमे ५०, २५ व २५ टक्के असा होता. ग्रामीण क्षेत्रात व्यवसायाचा केंद्रबिंदू कृषी व्यवसाय असतो. सन १९४८ मध्ये ग्रामीण पुनर्रचना योजना जपान मध्ये कार्यान्वित झाली. या योजनेअंतर्गत कृषी व उद्योग यामध्ये समन्वय असणारे उद्योग ग्रामीण क्षेत्रात स्थापन करून कृषीवरील अतिरिक्त भार कमी करण्याचे उद्दीष्ट होते. इ.स. १९८४ मध्ये जपानच्या रोजगार आलेखाप्रमाणे कृषीमधील रोजगार टक्केवारी सहापर्यंत खाली आली.यातंत्रामुळे जपान मधील दरडोई उत्पन्न १९४८ मधील ३०० डॉलरवरून १९८४ मध्ये ११००० डॉलर झाले.

**ड) शाश्वत समाजव्यवस्थेची दृष्टी** (**Spiritual Vision**) –

अहिंसक व शोषणविरहीत समाजव्यवस्थेसाठी ग्रामीण औद्योगिकरणाची भूमिका महात्मा गांधीचे सहकारी डॉ. जोसेफ कॉर्नाव्हालिस कुमारप्पा यांनी स्थायी समाजव्यवस्थेद्वारे मांडली . संसाधनात वारंवार निर्माण होत असणारे शाश्वत संसाधन (कृषी व वन)व मर्यादित साठा असलेले अशाश्वत संसाधन( कोळसा ,धातू )अशी विभागणी होते. उत्पादन व्यवस्थेत जेथे शाश्वत संसाधन मनुष्याच्या गरजा भागवू शकते तेथे अशाश्वत संसाधनाचा उपयोग टाळता येतो. कृषी व वनआधारित संसाधनाचा उपयोग करून ग्रामीण औद्योगिकरणाद्वारे खेडी स्वयंपूर्ण स्वावलंबीत झाले तर अशाश्वत संसाधनावरील परावलंबन कमी होईल. या तत्वावर आधारित असलेले.ग्रामीण औद्योगिकरण स्थायी (शाश्वत) समाजव्यवस्था धारण होण्यास प्रोत्साहन देणारी व्यवस्था ठरते. यामुळे परंपरागत व्यवसायातील तांत्रिक व व्यावसायिक कौशल्याला आधुनिक विज्ञान व तंत्रज्ञानाची जोड मिळून खेडयातूनच उद्योजक (**Job creator**) निर्माण होतील म्हणून .ग्रामीण क्षेत्रांत आधुनिक शिक्षणाचा उपयोग स्वयंव्यवसायासाठी करून स्वावलंबीत व्हावे व या देशातील करोडो युवकांना स्वतःला कार्याचा स्वधर्म देता यावा म्हणून गुणात्मक ज्ञानासाठी 'नई तालीम' प्रयोग केला.म्हणून देशाचे समृद्धी संदर्भात समाजव्यवस्थेचे आध्यात्मिक व्यवस्थापन होणे हीच गांधींची समाज वैज्ञानिक व अर्थशास्त्रीय दृष्टी ठरते.

## ३.२)समाजधारणेतील योजक भूमिका (organizational leadership)

**The role of a creative leader is not have all the ideas; it's to create a culture where everyone can have ideas and feel that they're valued.- Ken Robinson**

समाजामध्ये संसाधन निर्मितीच्या प्रक्रीयेत समाजवैज्ञानिकाची भूमिका खालीलप्रमाणे असते.

१. वैज्ञानिक : विज्ञानाद्वारे निसर्गाचे मूळ सत्य शोधतो.(Basic Facts)

२. तंत्रवैज्ञानिक : मूळ सत्याचा उपयोग करून प्रक्रीया पध्दती, यंत्रे निर्माण करतो.

३. उद्योजक : उपलब्ध तंत्रज्ञानाला व्यावसायिक व किफायतशीर करतो. (Economically Viable)

४. समाजवैज्ञानिक : उपलब्ध तंत्रज्ञानाचा उपयोग आपल्या, समाजाला, देशाला आवश्यक अशा स्वरूपात बसवून अशा तंत्रज्ञान, यंत्राना प्रोत्साहीत करतो. (**Socio Economically Viable**) व त्याला किफायतशीर करणाऱ्या व्यवस्थेला प्रोत्साहित करतो. ज्यामुळे विक्री सुलभ होते. समाजधारणेत समाजवैज्ञानिकाची योजक भूमिका असते.

**अमंत्रं अक्षरं नास्ति नास्ति मुलम अनौषधम्।**
**अयोग्य:पुरूषो नास्ति योजकः तत्र दुर्लभः।**

अर्थात असा एकही शब्द नाही की ज्याद्वारा विद्या बनणार नाही अशी एकही वनस्पती नाही ज्यापासून औषध बनणार नाही. असा एकही मानव नाही की जो समाजोपयोगी होणार नाही. फक्त याची जाण असणारा व याचे योग्य संघटन व व्यवस्थापन करणारा योजक दुर्लभ असतो. अर्थात ज्या सृष्टीत व्यक्ती जन्माला आला ती सृष्टी ज्ञानविज्ञान निसर्ग संसाधन मानवी संसाधन अशा उपयुक्त संसाधनांचे भांडार आहे आणि व्यक्तीच्या योजक या भूमिकेतील कार्य समाजाला नवीन आयाम देत असते.

## अ)जीवनातील परिवर्तनाचे तत्वज्ञान (Change of Attitude):

### संशय(आंतर्विघ्न)मुक्ती

(*To resolve comflict of Decesion*) :

मनुष्याचे व्यक्तिमत्व व त्याचा जीवनमार्ग यांचा निकटचा संबंध आहे व प्रत्यक्ष जीवन मार्गात कार्य घडत असते म्हणून व्यक्तिमत्त्व व कार्य यांचा संबंध स्पष्ट होतो.वर्तमान कार्याची पूर्वस्थिती**(Precondition)**असते.स्वतःच्या मार्गाची जाण असणे हा विश्वास ठरतो.विश्वास नसेल तर प्रज्ञावादी प्रवृत्तीचा आश्रय करतो. जीवनमार्गातील संशय अज्ञान ठरते तर विश्वास ज्ञान ठरते. हाच विश्वास येणे आध्यात्मिक क्रांतीचा( **Change of Attitude)** हेतू आहे.

जीवनातील व्यवहारात करावयाच्या कार्यात विश्वास वाटत असेल तर मार्ग पक्का होतो व निष्ठेने कार्यरत होतो.पण संशय वाटत असेल दुःख वाटत असेल तर मार्ग कच्चा होतो.म्हणून सुखी होण्यासाठी प्रज्ञावादाचा आश्रय करतो .यामुळे अर्थपूर्ण जीवन जगण्याचा अधिकार गमावित असतो.प्रकृतीतील द्वंदामुळे (आसक्ती–द्वेष )जीवनमार्ग पक्का होत नाही. या अवस्थेत बुद्धी अस्थिर असते.यामुळे चांगला व्यक्तीही स्वत:चा मार्ग चालताना सुखासाठी प्रज्ञावादी भूमिका घेतो .दुःख, भय, यामुळे असूरक्षितता वाटते. म्हणून शक्तीची गरज असते.ज्यांना शक्तीचे महत्व कळते,तेच कार्यातून भक्ती (योग) करतात.,ज्यांना भक्तीचे महत्व कळते,त्यांना स्वत:च्या मार्गाचे महत्व कळते.स्वत:चा मार्ग कळला तरच ज्ञानाची गरज पडते. शक्ती व ज्ञान याचे नाते कळते.

***People decides their habits,and their habits decide their future.We are what we repeatedly do.Excellence ,then,is not an act,but a habit.-Aristotle.***

प्रत्येक व्यक्ती त्याला लाभलेल्या प्रकृतीनुसार, संस्कारानुसार जगत असतो.आपण ज्या जगात जगत आहो. तेथील सापही प्रकृति आहे.संपूर्ण जगच स्वभावानुसार(प्रकृति) कार्यरत असते.संवय प्रकृती असते,तर मानसिकता ज्ञानाचा विषय असतो. जशी दृष्टी असते तसे दिसते.हीच दृष्टी संवय बनविते.संवय प्रकृति

बनते.याप्रमाणे स्वभाव (conditioned nature ) बनतो. दृष्टी (ज्ञान) व प्रकृति(संवय)याने व्यक्ती बद्ध (conditioned) होतो.यालाच आपण व्यक्तीमत्व म्हणून ओळखतो. आपण जगण्याची जशी संवय करतो, तसे व्यक्तीमत्व घडत असते.

जगातील मानवी विकासात मानवी बुध्दीचा अविष्कार आढळतो.मनुष्य बालपणापासूनच पायऱ्या पायऱ्यांनी प्रगती करतो,त्याला आपला अविष्कार दाखविण्याकडे उपजतच कल असतो, व त्यातूनच त्याचे व्यक्तीमत्व घडत असते. मनुष्यामध्ये अशी एक नैसर्गिक क्षमता असते ज्यामुळे स्वतः निर्णय घेऊन स्वतःच्या आयुष्याला योग्य वळण लावू शकतो.पोळी कां करपली,घोडे कां अडले? उत्तर एकच फिरविले नाही.परिवर्तनाचे हेच रहस्य आहे.जीवनाचे आव्हान स्वीकारण्यास मनुष्याला समर्थ करेल अशा ज्ञानाची मनुष्याला गरज असते.

## जीवनातील बदलाचा आधार :प्रकृती (संवय) व ज्ञान(दृष्टी)

सुखाचा शोध करीतच मनुष्याचा जीवनप्रवास चालू असतो.या प्रवासात जशी स्वतःची ओळख असते तशी दृष्टी असते.अनुभवातून, ऐकून जे बुद्धीत साठले असते,तशी दृष्टी बनते.जशी दृष्टी तसे विचार असतात.जसे विचार तसे कार्य घडत असते.जे अयोग्य आहे ते घडून येण्यास अज्ञान कारण ठरते,तर जे योग्य आहे ते घडवून आणण्यास ज्ञान कारण ठरते.जशी मानसिकता असेल तशी दृष्टी असते.मानसिकता बदल ज्ञानाचा विषय ठरतो. .ज्ञान जीवनातील भ्रम,संशय दूर करण्यासाठी असते.विश्वासासाठी ज्ञान असते.बुद्धीभ्रम न होता बुद्धीला सक्षम करण्यासाठी जगात ज्ञान उपलब्ध झाले.ज्ञानाची निवड झाली नाही तर प्रकृति आपले कार्य घडवीतच असते.मानसिकतेत बदल घडविण्यासाठी ज्ञान हाच संदेश भगवद्गीतेतून मिळतो.

डॉ.अब्दूल कलाम म्हणतात,तुम्ही तुमचे भविष्य बदलवू शकत नाही पण संवय बदलवू शकतो.खचीतच तुमच्या संवयी तुमचे भविष्य बदलवू शकतात. विचार बदलले की दृष्टी बदलते,दृष्टी बदलली की जग बदलते.व्यवस्थापनातील **काइझेन** हा शब्द चुकीची संवय बदलविणे यासाठी वापरतात. चुकीची मानसिकता बदलविणे यासाठी भगवत्गीतेतील आध्यात्मिक क्रांतीचा संदेश वापरलेला आहे.

## अहंकार *Vs* ज्ञान :

**कार्यकरण कर्तृत्वे हेतूः प्रकृति उच्यते**

**पुरूषः सुखदुःखानां भोक्तृत्वे हेतूःउच्यते.**(गीता १३–२१)

अर्थात कार्य घडण्यास प्रकृति कारण असते व चेतन आत्मा सुखदुःख भोगण्यास कारण ठरतो.मन(***Aware mind)***,बुध्दी(***Information mind),***चित्त (***Conditioned mind*** )व अहंकार (***The***

***Self*** ) हे  चार अंग बुध्दीला कार्यरत ठेवतात.मन देवळात चित्त खेटरात ' अशी ग्रामीण म्हण आहे . मन व चित्त यातील

भेद ज्ञात करते. व्यक्ती जीवंत असतो म्हणून सुखदुःख जाणत असतो.साखर गोड आहे यातील गोड रस बुध्दी जाणत असते,तसेच चित्तसुखही(Happiness)  बुध्दी जाणत असते.चित्तसुख आत्मा जाणत असतो.चेतन आत्माच सुखदुःख भोगण्यास कारण ठरतो. बुध्दी सत–असत यातील भेद जाणून योग्य  व अयोग्य याचा निर्णय करते.मन इंद्रियरसाचा केंद्रबिंदू असतो.यामुळे द्वंद्वाचे कारण  मन ठरते.एखादे चुकीचे कार्य करतांना मनाचा आवाज पूढाकार घेतो,तर आत्म्याचा आवाज भय (चोरी करताना कुणी पहात तर नाही ना?) निर्माण करते.अशीच जगण्याची संवय झाली तर आत्म्याचा आवाज कळतही नाही व मन अशांतीत भटकत राहते.आत्म्याचा आवाज चांगल्या कार्याला प्रोत्साहन देते.तर या कार्यात मन संशय निर्माण करते.बुद्धीभ्रम करते.हा बुद्धीभ्रम दूर केला नाही तर प्रकृति आपले कार्य करीतच असते.

**स्वभावजेन कौंतेय निबध्दः स्वेन कर्मणा**

**कंर्तुम  न इच्छसि यतमोहात करिष्यशी अवशो अपि तत्**  (गीता १८/६०)

अर्थात प्रकृतिच्या सक्रीयतेमुळे प्रकृतिला वश असल्यामुळे कार्य चालुच असते.स्वतःच्या विकास दृष्टीनुसारच कार्यरत असते. प्रकृती नुसार जीवनाची भूमिका असणे ही नैसर्गिक प्रवृत्ती आहे . चुकीची संवय कळली तर चांगली  संवय कळते.अज्ञान कळले तरच ज्ञानाची गरज पडते.हेच ज्ञान बदल घडवून आणते.मनुष्याला जे योग्य वाटते त्याची संवय करतो.संवय स्वभाव बनतो.स्वभाव प्रकृती बनते.अहंकाराचा आश्रय करून प्रज्ञावादी भूमीकेला  ज्ञानी समजले तरी प्रकृती कार्यरत असतेच.याच आधारावर अर्जुनाला अज्ञानी ठरविले .अहंकाराचा आश्रय प्रकृतीचा आश्रय असतो .अहंकाराचा आश्रय असल्यामुळे प्रज्ञावादी प्रवृत्ती  सूटत नाही.तो स्वभाव (conditioned attitude)बनतो.हीच चुकीची संवय बदलविण्यासाठी दृष्टीबदल,दृष्टीबदल होण्यासाठी मानसिकता बदल व मानसिकता बदल होण्यासाठी आध्यात्मिक क्रांतीचे प्रयोजन आहे.

## मानसिकताबदलासाठी ज्ञान : आध्यात्मिक क्रांती

***Progress is impossible without change,and those who cannot change their minds cannot change anything.- George Bernard Shaw***

मानसिकता (*State of mind/Conditined Attitude*)बदल करण्यासाठी दृष्टीबदल  हा  ज्ञानाचा विषय ठरतो . प्रकृतीनुसार कार्यरत असणे व सुखासाठी प्रज्ञावादी भूमिका  घेणे ही प्रकृतिच असते.दुःखाचा आश्रय करीत जगणे ही संवय नकारात्मक मानसिकता बनविते.बुद्धीत संभ्रम असतो तेंव्हा वैचारिक प्रदूषण हेच

संभ्रमाचे कारण असते.यामुळे प्रज्ञावादी संवय जडते. संवय प्रकृति असते.संवयबदल हा प्रकृतिचा विषयअसतो.ज्ञानाने दृष्टी बदलते.प्रज्ञावादी प्रवृत्ती संवय (प्रकृति)व मानसिकता (ज्ञान )याचा संगम असते. हीच प्रज्ञावादी मानसिकता ठरते. प्रकृती बंधन व बंधनमुक्तीसाठी ज्ञान अशी विभागणी केली तर प्रज्ञावाद व ज्ञान यातील भेद कळतो.मनुष्य जीवनाची प्रज्ञावादी संवय ही नकारात्मक मानसिकता(भूमिका) व ज्ञानी सकारात्मक मानसिकता (भूमिका) हाच भगवत्गीतेचा आधार आहे.

**ज्ञानी –** वर्तमानात बुद्धीला वैचारिक प्रदूषणापासून मुक्त करण्यासाठी बुद्धियोग**(तस्मात सर्वेषु कालेषु योगयुक्तो भवार्जुन**– गीता ८–२७) हा संदेश दिला. जीवनमार्गात व्यावहारिक पारदर्शकता आणणे .जीवनमार्गात विश्वासासाठी ईश्वरज्ञान व मानसिक शक्तीसाठी योग यासाठी जीवनाची पातळीबदल करणे हाच आध्यात्मिक क्रांतीचा हेतू ठरतो.

ज्ञानी(बुद्धियोगी) होणे जीवनविकासात साध्य आहे.ज्ञानी या संदर्भात प्रज्ञावादी मानसिकता ( प्रकृति)ज्ञानी दृष्टीत(ज्ञान) बदलविणे व विकासाची सकारात्मक दृष्टी लाभणे हाच आध्यात्मिक क्रांतीचा हेतू आहे.या प्रक्रियेत प्रतिस्थापना(Replacement of positive state of mind ),प्रतिस्थापनेसाठी दृष्टीबदल (Vision),दृष्टीबदलासाठी ज्ञान (Knowledge)असते.चांगले –वाईट (सत–असत)असे द्वंदच प्रज्ञावादी भाष्याचा आधार असतो.द्वंद्वमुक्ती (समत्व) हे साध्य असते व चांगलेपणा साधन ठरते.सोने असेल तर चमकतेच. चांगले सत् असते,**सत्यमेव जयते** हा विश्वास येणे हाच आध्यात्मिक क्रांतीचा उद्देश आहे.

जीवनमार्ग पक्का करण्यासाठी स्वधर्माचे(Tiebreaker) शिक्कामोर्तब करणे व कार्यातून योगसाधना करणे यासाठी मनुष्यजीवनात धर्माची भूमिका असते.कार्याद्वारे योग साध्य करून सक्षम होणे हा जीवनाचा उच्च मार्ग ठरतो.यासाठी वर्तमानातील कार्याचे व जीवनमुल्यांचे महत्व स्पष्ट होते. जीवनमार्गातील कार्याचा आध्यात्मिक व्यवस्थापनासाठी याच शास्त्राचा उपयोग श्रीकृष्णाने केला.

## ब )जीवनमार्गाचे आध्यात्मिक व्यवस्थापन

जगातील प्रत्येक व्यक्ती स्वभावनियत मार्ग चालतो.तर महान व्यक्ती बुद्धीयोगाद्वारे महान होतो .व्यावहारिक जीवनापासून पलायन न करता जगाच्या भौतिक विकासाचे प्रवाहात स्वतःची भूमिका सक्षम करणे व कार्याद्वारेच स्वतःतील शाश्वत दिव्यत्वाचे ज्ञान होणे हा ज्ञानमार्ग भगवद्गीतेने दिला. कार्य भोगैश्वर्य प्राप्तीसाठीच केल्या जाते म्हणून कार्य त्यागून संन्यास घेणे हाच उच्चमार्ग आहे हा समज दूर केला.मनुष्याची सामान्य पातळी प्राकृतिक असते . प्राप्तीसुखासाठी कार्यरत असतो हा व्यवहार मार्ग असतो या मार्गातील संभ्रम अज्ञान ठरते. ईश्वरज्ञान विश्वासाचे साधन असते. ईश्वरज्ञानामुळे आंतर्विघ्नमुक्ती होऊन बुद्धीयोग प्राप्त होतो. म्हणून ईश्वरज्ञानाद्वारे अज्ञान दूर करून व्यवहारमार्ग ज्ञानमार्ग करणे व विश्वासाने मार्ग चालून

कायाद्वारे योगसाधना करणे हेच स्वतःच्या ज्ञानी भूमिकेचे रहस्य आहे.या ज्ञानाद्वारा समूहाचे व्यवस्थापनातील नियतकार्य,सत्कार्य याला स्वधर्म **(Tiebreaker) ठरवीत असतो.**निर्णयाला कर्मयोग(दृढनिश्चय) ठरवीत असतो.वर्तमानात स्थीर (योगयुक्त)असतो.

*भन्साळी महाराज आत्मज्ञानासाठी वणवण भटकत होते. जगातील दुःख आपण दूर करू शकत नाही याचे त्यांना दुःख होते. तेव्हा महात्मा गांधीनी त्यांच्या समस्येचे निराकरण केले. जसा स्वतःच्या पायात काटा गेल्यास आपण त्याला काटा काढण्यास फक्त मदत करू शकतो हेच प्रत्यक्ष सत्कार्य आपल्या अधिकारात आहेत. याद्वारा ईश्वरभक्ती होते. त्याप्रमाणे भावनांचे ज्ञानामध्ये रूपांतर करणे* ***(Transformation of emotion into devotion*** *)हाच उपाय असतो असा सल्ला दिला.हीच भन्साळी महाराजाची आंतर्विघ्नमुक्ती ठरली.*

**अधिकाराची पारदर्शकता व दायित्व** :


स्वातंत्र्य ही मानवाची मूलभूत प्रेरणा आहे.याचाच अर्थ स्वतःला अधिकाराची पारदर्शकता आवश्यक असते. ज्ञानी स्वतःचा स्वतंत्र मार्ग चालत असतो.यामुळेच स्वातंत्र्याचे महत्व जाणतो.अर्जुनावर अशी वेळ आलेली असते की, जेंव्हा त्याला फक्त स्वतःचा मार्ग चालावा लागतो.

**विमृश्य एतद् अशेषेण यथा इच्छसि तथा कुरू** (गीता १८–६३)अर्थात तुझ्या अधिकारात निर्णय आहे मी ज्ञानमार्ग दिला .उच्चत्तम आध्यात्मिक अवस्थेत प्रवेश होण्यासाठी तुलाच निर्णय घ्यायचा आहे.याप्रमाणे भगवद्गीतेने स्वतःचा निर्णय अधिकार अबाधित ठेऊन जीवनमार्गातील भ्रम दूर केलेला आहे. कालानुरूप समाजव्यवस्थेच्या बदलत्या प्रवाहातही स्वतःला निर्णय अधिकार देणे, बुद्धीची सकारात्मक व स्थीर अवस्था अर्थात प्रसन्नता लाभण्यासाठी बुद्धीला संस्कारीत करणे हे सत्य अपरिवर्तनीय आहे. तर मनुष्याने स्वतःला व्यावसायिक कार्य देणे त्याचे दायित्व ठरते. व्यक्तिगत व्यावसायिक कार्य स्वधर्माचे साधन जाणणे हे ज्ञान व्यावसायिक कार्याचे आध्यात्मिकीकरण करण्याची दृष्टी देते. म्हणून समाजव्यवस्थेच्या बदलत्या प्रवाहात कार्यभूमिका देण्यासाठी कार्याचे व्यवस्थापन करून स्वतःला सहजकार्य देणे हे वर्तमानातील दायित्व ठरते.

------------------------------


गीता सर्वांनाच वंदनीय आहे. काही लोक अजिबात न वाचता तिला वंदनीय म्हणतात. काही वाचायचा प्रयत्न करतात व सोडून देतात. काही तिचा अर्थ न समजता ती वाचतात, तिचे पठण करतात. काही तिचा अध्यात्मिक अर्थ समजून घेऊन वाचतात. श्रीमद्शंकराचार्यांनी त्यातला ज्ञानयोग जाणला व जाणकारांत पसरवला. संत ज्ञानेश्वरांनी त्यातला भक्तीयोग अंगी बाणवला आणि सामान्यजनांत प्रसार केला. लोकमान्य टिळकांनी त्यातल्या कर्मयोगाचे तत्कालीन महत्त्व जाणले आणि गीतारहस्याद्वारे तो लोकांप्रती पोहोचवला. स्वामी विवेकानंदांनी तिचे वैश्विक महत्त्व जाणून ती आंतरराष्ट्रीय स्तरावर नेली. हे सर्व गेल्या शतकांतील त्या त्या काळांशी सुसंगत होते.  श्री. साहेबराव जवंजाळ यांनी २१ व्या शतकातील तरुणांना ही गीता किती मार्गदर्शक आहे याचे सार्थ दर्शन त्यांच्या पुस्तकातून घडवले आहे. एका अर्थी त्यांनी आपल्याआधीच्या या चार महानुभावांचे कार्य पुढे नेले आहे. भगवद्गीता सार्वकालीन आहे, वैश्विक आहे आणि चिरतरूण आहे. ते बदलाच्या व्यवस्थापनाचे तत्त्वज्ञान आहे. Today's youth has to face the challenge of CHANGE and Bhagavadgeeta is the right Philosophy for MANAGING the CHANGE in right direction. या संदर्भात साहेबरावांनी जगभरातील अनेक महान तत्त्ववेत्त्यांचे व विचारवंताचे विचार संदर्भासाठी नेमके मांडले आहेत. भगवद्गीतेचे अनेक पैलू व त्यांची आजच्या व येणाऱ्या काळाशी सुसंगती त्यांनी मांडली आहे. हे पुस्तक अध्यात्माहून अधिक व्यवस्थापनशाश्त्राचे आहे.

हे पुस्तक प्रत्येक तरुणाने वाचावे असा आमचा आग्रह राहील. नुसते वाचू नये तर ते आत्मसात होईतो वाचावे. अभ्यासावे.



खालील कव्हरवर क्लिक करून थोडा वेळ थांबा.

पुस्तक आपोआप उघडेल.



**चार पुस्तकं वाचली म्हणजे कोणी शहाणा होतो का?**

**हो.**

**होतो.**

कोणत्याही प्राण्याला, सजीवाला, अनुभवाने शहाणपण येतं. बऱ्याच प्राण्यांना काही प्रमाणात त्यांचे जन्मदाते थोडंफ़ार शिक्षण देतात. पण मानव हा असा प्राणी आहे ज्याला स्वतःचे अनुभव व आईवडील यांसोबत पुर्वी जगलेल्या आणि आता जिवंत नसलेल्या माणसांचे अनुभवही शिकता येतात. ते पुस्तकांद्वारे. माणसाला आपल्या सभोवताली नसलेल्या, दूर देशातल्या माणसांचे अनुभव समजून घेऊन शिकता येतं. तेही पुस्तकांद्वारे. प्रत्यक्ष अनुभवांहून चांगला शिक्षक नाहीच. पण इतरांना आलेले अनुभव, त्यांनी खाल्लेल्या ठेचा याही माणसाला शिकवतात आणि शहाणे करून सोडतात.

**म्हणून वाचा**

**कृपया वाचत रहा.**

**म्हणून वाचा. वाचत रहा.**


**www.esahity.com**

**www.esahity.in**

**विनामूल्य वाचक नोंद करण्यासाठी लिहा**

**esahity@gmail.com**